# ISBN PAPER AND BOOKS


# 2021 - 22

Scanned with OKEN Scanner

(6) 2021-22

# नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी

प्राचार्य डॉ. केशव फाले गौरवग्रंथ



।संपादक।

प्राचार्य डॉ. गजानन जाधव

- नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी : डॉ.केशव फाले गौरव ग्रंथ
  संपादक : प्राचार्य डॉ. गजानन जाधव
- Navvadottar Marathi Gramin Kadambari : Dr. Keshao Phale Gaurav Granth
  Edited by : Prin. Dr. Gajanan Jadhav

- © संपादक

- प्रकाशक :
  सौ.चित्रा प्रमोद गारोडे,
  अनघादित्य प्रकाशन,
  'कमलकुंज', २९, गोवर्धन विहार,
  परतवाडा, जि. अमरावती
  भ्रमणभाष : ९४०५४२७०६२
  anaghadityapublication@gmail.com

- प्रथमावृत्ती : १५ ऑक्टोबर, २०२१ (विजयादशमी)
- ISBN-978-93-92872-00-6

- मुखपृष्ठ : डॉ.विशाल इंगोले, लोणार

- अक्षर जुळवणी व मांडणी : श्री. नारायण पाझाडे,
  यश मल्टी सर्व्हिसेस, जुना जालना, जालना
  भ्रमणभाष : ९४२३४५७०३७
  imagepagesetters@gmail.com

- छपाई : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.,
  जी-१२, एम.आय.डी.सी.,
  चिकलठाणा, औरंगाबाद
  printwell@gmail.com

- मूल्य : ४००/-

---

१. या ग्रंथातील लेखकांच्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
२. या पुस्तकाचे, पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण, फोटोकॉपींग, रेकॉर्डींग अथवा कॉपीराईटचा भंग होईल असे कुठल्याही प्रकारचे वर्तन संपादकाच्या लेखी परवानगी शिवाय करता येणार नाही. सर्व हक्क सुरक्षित आहेत.

Scanned with OKEN Scanner

## ▪ अनुक्रमणिका ▪

भाग : एक

- प्रकाशकाचे दोन शब्द... /सहा
- संपादकीय... /सात

१) नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी : संकल्पना आणि स्वरूप
- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले/१४

२) नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी : आविष्कार तंत्रे आणि शैली
- डॉ. किशोर सानप/३५

३) महात्मा जोतीराव फुले आणि नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी
- डॉ. प्रल्हाद लुलेकर/९१

४) नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीतील मिथके
- डॉ. अशोक राणा/११४

५) नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील राजकीय अवकाश
- डॉ. प्रमोद मुनघाटे/१४१

६) नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीची शैली
- डॉ. महेंद्र कदम/१५३

७) नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी : एक आकलन
- डॉ. शंकर विभुते/१७१

८) नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील भटक्या विमुक्तांचे जीवन
- डॉ. गिरीश मोरे/१८४

९) बदलते ग्रामवास्तव आणि नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी
- डॉ. अरुण शिंदे/१९६

१०) जागतिकीकरण आणि नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी
- डॉ. गणेश मोहिते/२११

११) नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील संस्कृतीभान
- डॉ. केदार काळवणे/२२७

१२) नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषिशोषितांचे जग
- डॉ. दत्ता घोलप/२४५

१३) नव्वदोत्तर वैदर्भीय मराठी ग्रामीण कादंबरी
- डॉ. सतीश तराळ/२६२

१४) नव्वदोत्तर गोमंतकीय मराठी ग्रामीण कादंबरी
- प्रा. विनय बापट/२७१

Scanned with OKEN Scanner

# नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील संस्कृतीभान

डॉ. केदार काळवणे

साहित्य हा संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. त्यांचा एकमेकांशी जैविक स्वरूपाचा आंतरसंबंध आहे. या आंतरसंबंधात सेंद्रियत्व आणि परस्परपूरकत्वाचे नाते आहे. सांस्कृतिक सामग्रीच साहित्याला आकार देत असते. साहित्याचा आशय आणि रूपबंध सांस्कृतिक जाणिवबंधाने घडलेला असतो. संस्कृतीतूनच साहित्याला विशिष्ट असा आकृतिबंध प्राप्त होत असतो. साहित्य हे समाज-संस्कृतीचे अपत्य असते. हेच अपत्य संस्कृतीचेही वाहक असते. प्रवाही असलेली संस्कृती आणि तिचा अवकाश साहित्यातून आविष्कृत होत असतो. 'साहित्यकृती'तून सांस्कृतिक अनुभवविश्वाचे प्रकटन होत असते. परस्परांना पुष्ट करणारे आणि एकमेकांना साह्यभूत ठरणारे असे सहसंबंध साहित्य नि संस्कृतीचे असतात. भाषा हा या दोहोंना जोडणारा समान दुवा आहे. भाषा हे साहित्याचे माध्यम आणि सांस्कृतिक नेणिवेचे वहन करणारे साधन आहे. भाषा हा संस्कृतीचा अंगभूत घटक आहे आणि याच भाषेच्या माध्यमातून सांस्कृतिक आविष्कार साहित्यातून होत असतो. म्हणूनच साहित्याचा सांस्कृतिक परिप्रेक्ष्यातील अभ्यास महत्त्वाचा ठरतो. सांस्कृतिक परिवेशाला वगळून 'साहित्यकृती' समग्रपणाने समजून घेता येत नाही. त्याशिवाय तिचे मूल्यमापनही नीटपणाने होत नाही. त्यासाठीच 'साहित्यकृती'ला असलेल्या सांस्कृतिक संदर्भाची उकल करणे आवश्यक असते.

कोणतीही साहित्यकृती ही समकालीन घटितांशी संबंधीत असते. समकालातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, भाषिक व्यवस्था

आणि वर्ग, जात, लिंगभाव, वंश, चळवळी, विचारप्रणाली, प्रतिकसृष्टी, भू-जैविकता यांच्याशी तिचा संबंध असतो. समकालीन संस्कृतीवास्तव आणि संस्कृतीचे बहुजिनसीपण 'साहित्यकृती'तून अधोरेखित होत असते. वर्तमानिक सांस्कृतिक पर्यावरणाने तिला प्रभावित केलेले असते. म्हणूनच कादंबरीसारखा विस्तृत समाजपट कवेत घेणाऱ्या वाङ्मयप्रकाराचा अभ्यास सांस्कृतिक दृष्टीने होणे गरजेचे असते. त्यातून कादंबरीचे आकलन अधिक स्पष्ट होण्याची शक्यता असते. जागतिकीकरणानंतर मराठीत निरनिराळ्या समाजस्तरातील लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे. विविध समाजगटातील लेखक अपरिचित संस्कृतीचित्रण मराठी कादंबरीमधून प्रकट करत आहेत. त्यामुळे सामाजिक अवकाशातील वैविध्यपूर्ण जीवनानुभव मराठी कादंबरीच्या कक्षेत आले आहेत. सांस्कृतिक जाणिवांची बहुविधता आणि सांस्कृतिक बहुजिनसीपण तीमधून ठळक झाले आहे. मराठी समाजाच्या उपसंस्कृती-पोटसंस्कृतीचे भान या कादंबऱ्यांमधून अधोरेखित झाले आहे. या कादंबऱ्यांची सांस्कृतिक दृष्टीने समीक्षा होणे आवश्यक आहे. तशी समीक्षा झाली तर आजच्या मराठी कादंबरी आकलनात नवी भर पडेल. म्हणूनच येथे नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा संस्कृतीव्यूहातून अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

॥२॥

ग्रामसंस्कृती ही आद्य भारतीय संस्कृती आहे. ती नागर संस्कृतीपेक्षा वेगळी आहे. "संस्कृतीमध्ये सामुहिक सह-कृती असते. या सह-कृतीमध्ये धर्माधिष्ठित तत्त्वे, आचार, आहार, पोशाख, प्रथा, परंपरा, समजुती आणि रोटीबेटी व्यवहाराचे कायदेकानून सर्व समूह संगनमताने परंपरेने पाळत असतो. म्हणून संस्कृती म्हणजे मानवी समूहाची वैशिष्ट्यांनिशी जगण्याची एक जीवनशैली असते. तो जीवनधर्म असतो. या विचारांच्या आधारे 'ग्रामव्यवस्थेत' परस्पर सहकार्य करीत जगण्याची एक जीवनशैली असते."[१] या जीवनशैलीचे शेती, निसर्ग, कुटुंबव्यवस्था, जातिरचना, धर्मशरणता आणि समूहभाव हे विशेष आहेत. ती 'शेती'ला केंद्रस्थानी ठेवून प्राचीन काळापासून विकसित होत आलेली आहे. शेकडो वर्षांच्या वाटचालीत तिला 'गावगाड्या'चे स्वरूप प्राप्त झाले होते. गावगाडा वेगवेगळ्या स्तररचनेतून घडलेला आहे. 'कुणबी' हा प्रत्यक्ष शेती करणारा आणि त्याला मदत करणारे आठरा अलुतेदार व बारा बलुतेदार हे गावकामगार. पाटील हा गावाचा प्रमुख आणि कुलकर्णी हिशोबनीस. या साऱ्या वर्गांचा मिळून गावगाडा तयार झालेला आहे. ढोबळपणे 'ग्रामसंस्कृती' ही एकरेषीय व 'ग्रामीण' या एकाच विशेषणांनी निर्देशित करता येत असली तरी गावगाड्यातील विविध वर्गात स्तरभेद आहेत. हे स्तरभेद विषमता ठळक करणारे आणि आपले सांस्कृतिक निराळेपण अधोरेखित करणारे आहे.



Scanned with OKEN Scanner

गावगाड्याच्या विशिष्ट रचनेमुळे पोटसमूहांची गावगाड्यांतर्गत वेगळी संस्कृती निर्माण झालेली आहे.

महाराष्ट्रीय ग्रामसंस्कृती ही अनेक शतकांच्या वाटचालीतून विकसित होत तिला 'गावगाड्या'चे स्वरूप प्राप्त झाले. हा गावगाडा आणि गावगाड्याची संस्कृतीही दीर्घकाळ स्थिर होती. मोगल राजवटीच्या स्थापनेनंतर या संस्कृतीत पहिल्यांदा बदल झाला. या काळात ग्रामसंस्कृती विस्कटली जाऊन तीमधील चैतन्य हरवले. ब्रिटीश राजवट स्थापनेनंतर या संस्कृतीत दुसऱ्यांदा स्थित्यंतर घडले. हे स्थित्यंतर परिणामकारक होते. आधुनिक मूल्यव्यवस्था आणि औद्योगिक अर्थव्यवस्थेमुळे पारंपरिक गावगाड्यात मोठे बदल झाले. तिसरे परिवर्तन भारतीय स्वातंत्र्यानंतर झाले. यातून आलेल्या लोकशाही व्यवस्थेनंतर गावगाड्याची चौकट हळूहळू सैल होत नव्या सामाजरचनेची चौकट आकारत गेली. १९९० नंतर ग्रामसंस्कृतीत चौथ्यांदा स्थित्यंतर घडले. मोगल राजवटीनंतर घडून आलेल्या चारही स्थित्यंतरांमुळे ग्रामजीवनाच्या भौतिक-अभौतिक संस्कृतीवर खोलवर परिणाम झाले. ग्रामजीवनाचे अंतरंग आणि बहिरंग बदलण्यास ही स्थित्यंतरे कारणीभूत ठरली. जागतिकीकरणानंतर ग्रामसंस्कृतीतील बदल अधिक ठळक झाले. ग्राम-नागर संस्कृतीच्या सरमिसळीतून आजचे ग्रामजीवन आकारलेले आहे. काही खेड्यांना अर्धनागरी संस्कृतीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

''संस्कृती परिवर्तनाचे, बदलाचे साहित्यावर खोलवर परिणाम होतात. आशय आणि रूपबंध या घटकांतून ही परिवर्तने प्रतिबिंबित होत असतात.... साहित्यकृती समकाळातील राजकीय-आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक घटनांशी, वर्गांशी, जातींशी, विचारप्रणालीशी, प्रतीकसृष्टीशी संबंधित असते.''[२] म्हणूनच येथे नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील संस्कृतीभान समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

याच परिप्रेक्ष्यातून एकूण ग्रामीण साहित्याचा विचार केला तर मराठी साहित्याच्या प्रारंभापासून ग्रामसंस्कृतीचे संदर्भ साहित्यात सापडतात. गेल्या दीड शतकातील मराठी साहित्यातून ग्रामसंस्कृती स्पष्टपणे अधोरेखित झालेली दिसते. नव्वदोत्तर काळात ग्रामसंस्कृती वास्तव मराठी कादंबरीतून अधिक ठळकपणाने प्रकट झालेले दिसते.

॥३॥

मराठी कादंबरीत ग्रामसंस्कृतीचे चित्रण विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच आलेले आहे. परंतु ते मराठी कादंबरीच्या केंद्रवर्ती नव्हते. साठोत्तरी



Scanned with OKEN Scanner

काळात एकूणच मराठी साहित्याचे केंद्र बदलले. त्याचा प्रारंभ स्वातंत्र्योत्तर काळातच झालेला होता. साठोत्तर काळात महाराष्ट्रातील शोषित-उपेक्षित समूहांचे जगणे मराठी कादंबरीच्या मध्यवर्ती धारेतून अभिव्यक्त झाले. अभावमय जगण्याचे विविध आवाज या कादंबरीतून उजागर झाले आहेत. ग्रामसंस्कृती आणि शेतीवास्तवाचेही प्रतिबिंब या कादंबरीतून उमटले आहे. पण या चित्रणप्रदेशातून ग्रामसंस्कृततीतील विविध वर्गसमूहांचे जाणीवभान आणि गावखेड्यातील तळकोपऱ्यांचे खोलवर दर्शनचित्र प्रकट झाले नाही. जे झाले ते एकूण ग्रामवर्ग आणि शेतीविश्वाचे अनुभवविश्व म्हणूनच अधोरेखित झाले आहे. वेगळ्या अर्थाने या अधोरेखनालाही महत्त्व आहेच. परंतु त्यातून ग्रामसंस्कृतीतील वेगवेगळ्या पोटवर्गांची 'आयडेंटिटी' ठळक झाली नाही आणि त्यांची प्रश्नांकित अभावभूमीही ऐरणीवर आली नाही. नव्वदोत्तर काळात मात्र मराठी कादंबरीतून ग्रामवास्तवाच्या बहुवर्गीय जीवनभान चित्रणाला अधिक गती आली. आज मराठी ग्रामीण कादंबरी अनेकस्तरीय वर्गानुभव आणि पोटसमूह संवेदन व्यक्त करते आहे.

मराठी ग्रामीण कादंबरीत संस्कृतीचित्रणाचा जाणीवपूर्वक प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळापासून झाला आहे. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आदी पहिल्या पिढीच्या ग्रामीण लेखकांनी ग्रामसंस्कृती कादंबरीतून प्रकट करण्याचा प्रयत्न केला. परंतु ग्रामसंस्कृतीतील सूक्ष्म वास्तव वा त्यातील बारकावे या कादंबरीतून आलेले दिसत नाही. नागरी चष्म्यातून ग्रामीण संस्कृती न्याहळण्याची एक दृष्टी त्यातून दिसते. शहरी वाचकांसाठी रुचिपालट म्हणून ग्रामजीवनातील पृष्ठस्तरीय संस्कृतीवास्तव कादंबरीतून या लेखकांनी व्यक्त केले आहे. त्यात कोरडेपणा होता. १९६० च्या आसपास आनंद यादव, रा. रं. बोराडे ही ग्रामीण कादंबरीची दुसरी पिढी उदयाला आली. ही पिढी प्रत्यक्ष शेतकरी कुटुंबातून आलेली होती. त्यामुळे ग्रामीण जीवनातील सांस्कृतिक वास्तवाची, त्यातील ताण्याबाण्याची त्यांना प्रत्यक्षानुभूती होती. ग्रामीण साहित्याची चळवळही त्यांनी उभी केली होती. परंतु चळवळ आणि या लेखकांचे लेखन यात अंतर होते. त्यांनी व्यापक ग्रामीण संस्कृतीविश्व कवेत घेण्याऐवजी व्यक्तिजीवन-नातेसंबंध यांना आशयकेंद्र बनवत कुटुंबकथा आणि गतस्मृतींची आठवरूपे कादंबरीतून मांडली. असे असले तरी या संस्कृतीनुभवात भोगलेपणाची जाणीव होती. १९८० च्या आगेमागे लिहिणाऱ्या नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे आदी तिसऱ्या पिढीच्या ग्रामीण लेखकांची सामाजिक-सांस्कृतिक जाणीव अधिक प्रगल्भ दिसते. ग्रामीण प्रश्न आणि बदलत्या सांस्कृतिक वास्तवाची नेमकी जाण या



Scanned with OKEN Scanner

लेखकांच्या कादंबऱ्यांतून प्रकटते. लेखनाबद्दलची ठोस अशी भूमिकाही त्यांच्या लेखनातून विशद होते. ग्रामीण समाजाच्या सांस्कृतिक शोषणाची पाळेमुळे या पिढीच्या कादंबरीतून अधोरेखित होताना दिसते. येथूनच खऱ्या अर्थाने ग्रामीण कादंबरीला संस्कृतीभान आले आहे. व्यापक सामाजिक पटावरील ग्रामसंस्कृती वास्तव चित्रणाची जाणीव येथूनच मराठी ग्रामीण कादंबरीत रूजली. पुढे या जाणिवेचा विकास झाला आहे.

नव्वदोत्तर काळात सदानंद देशमुख, शेषराव मोहिते, प्रतिमा इंगोले, कृष्णात खोत, आनंद विंगकर, प्रवीण बांदेकर, महेंद्र कदम आदी कादंबरीकारांची चौथी पिढी उदयाला आली. ही पिढी आजही लिहिते आहे. या पिढीचे ग्रामसंस्कृतीतील स्थित्यंतराचे आकलन अधिक नितळ आहे. त्यामुळे या आजच्या पिढीने बदलत्या ग्रामसंस्कृती वास्तवाला भिडण्याचा आणि त्यातील व्यामिश्रता कादंबरीतून मांडण्याचा चांगला प्रयत्न केलेला दिसतो.

नव्वदोत्तर काळात सामाजिक आणि साहित्यिक जीवनातल्या चळवळी मंदावत जाऊन क्रमाक्रमाने संपल्या. साठोत्तर काळात मराठी ग्रामीण कादंबरीत वास्तव चित्रणाची जी जाणीव उदयाला आलेली होती, ती याही काळात प्रवाहित होत राहिली. साठोत्तरी ग्रामीण कादंबरीने वास्तव रेखाटणाची जी वाट निर्माण केलेली होती, त्याच वाटेने याही काळात ग्रामीण कादंबरीची वाटचाल सुरू राहिली. तिचा विकास-विस्तार झाला; परंतु ग्रामीण कादंबरीत नवी परंपरा निर्मिण्याइतपत बदल या टप्प्यावर झालेला दिसून येत नाही. असे असले तरी चहुअंगाने ग्रामीण स्थित्यंतरांना भिडण्याचा आणि त्या स्थित्यंतरांच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न या काळातील ग्रामीण कादंबरीने केलेला दिसतो. या टप्प्यावर ग्रामीण कादंबरीत मोठ्या प्रमाणात वाङ्मयीन स्थित्यंतर घडण्याची शक्यता होती. पण तसे घडताना दिसत नाही. या काळातील ग्रामसंस्कृती वास्तवाला भिडणाऱ्या कादंबऱ्यांचा निर्देश करण्यापूर्वी नव्वदोत्तर सामाजिक-सांस्कृतिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे.

॥४॥

संस्कृती ही मानवाच्या सर्व व्यवस्थांशी जोडलेली, त्यांना सामावून घेणारी आणि त्याच्या वर्तनव्यवहाराशी संबंधित असते. समाजातील अनेकविध व्यवस्थांच्या समुच्चयातून 'संस्कृतीभान' प्रकट होत असते. नव्वदोत्तर ग्रामसंस्कृतीत घडून आलेल्या स्थित्यंतराच्या तळाशी नवभांडवली व्यवस्थेचा अंमल कारणीभूत आहे. सोबतच परंपरागत वर्णरचनेतून निर्माण झालेल्या जात, धर्म, वर्ग, लिंगाधारित व्यवस्थेने घडवलेली संस्कृतीही अस्तित्वात आहे. त्याचाही प्रभाव 'ग्रामसंस्कृती'वर आहे.



Scanned with OKEN Scanner

नवभांडवलीकरणाच्या आर्थिक मन्वंतराचे दूरगामी परिणाम एकूणच भारतीय समाजजीवनावर झालेले आहेत. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीच्या संस्कृतीभानाच्या आकलनासाठी या काळातील सांस्कृतिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. नव्वदोत्तर भारतीय समाजजीवनात मुक्त अर्थव्यवस्थेने संचार केला. १९९१ ला भारताने गॅट करारावर स्वाक्षरी केली. तेथून मुक्त अर्थव्यवस्था नामक जागतिकीकरणाला प्रारंभ झाला. खासगीकरण-उदारीकरणही स्वीकारलेले होतेच. त्याचाही परिणाम जाणवत होता. या 'खाउजा' चे सर्व क्षेत्रावर बरे-वाईट परिणाम झाले. ग्रामीण जीवन या नव्या व्यवस्थेत कोलमडून पडले. या प्रक्रियेतून ग्रामीण परिसरात पृष्ठस्तरीय आधुनिकता अवतरली. परंतु गावगाडा मात्र आतून पोखरला गेला. अनेकविध कारणांनी या काळात भारतीय शेतकरी दरिद्री बनत गेला. त्यातून हतबलता निर्माण झाली. परिणामस्वरूप देशात आणि महाराष्ट्रात १९९० नंतर हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. हे या काळातील दाहक आणि भीषण सामाजिक-सांस्कृतिक वास्तव आहे. या काळात शेतीजीवनाकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. शेती हा परवडणारा व्यवसाय नाही, अशी शासनकर्त्यांसह सर्वच घटकांची धारणा झाली. त्यामुळे शेती-शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असणारे सर्व घटक कमालीचे असुरक्षित आणि हतबल झाले. या काळात खेड्याच्या शोषणाच्या नव-नव्या वाटा निर्माण केल्या. 'सेझ'सारख्या प्रकल्पांनी हजारो एकर 'पिकाऊ' जमिनी हडपल्या. पाणी-वीज यांचे दुर्भिक्ष वाढले. त्यातून नापिकी आली. नापिकीतून कर्जबाजारीपण वाढले.

पिकलेल्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत येत जगण्याची उमेद हरवून बसला. दिवसेंदिवस क्रमाक्रमाने कंगाल होत गेला. उद्योग आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हाती सत्ता एकवटल्यामुळे शेतीक्षेत्र दुर्लक्षित राहिले. भ्रष्टाचार, बेरोजगारी, शिक्षणाचे बाजारीकरण, राजकारणाचे विकृतीकरण आणि त्यातून वाढलेली गुंडगिरी, खून, जातीय संघर्ष, शासकीय योजनांतून होणारे शोषण, दुष्काळाने होरपळून निघालेला ग्राम इलाखा अशा अनेकविध अस्मानी-सुलतानी कारणांनी नव्वदोत्तर ग्रामीण जीवन कोलमडून पडले. त्यातून आत्महत्यांसारखे भीषण वास्तव समोर आले. या काळात "ग्रामीण जीवन झपाट्याने बदलले.हा बदल भौतिक स्वरूपातील आणि अभौतिक स्वरूपातील आहे. शाळा, महाविद्यालये, दवाखाने, हॉटेल्स, ढाबे, परमीट रूम्स, रस्ते, विविध वाहने, टी.व्ही.आदींसह बऱ्याच गोष्टींचा शिरकाव ग्रामीण भागात झाला आहे."[३] संगणक आणि तंत्रज्ञान क्रांतीच्या परिणामातून झालेल्या बदलांनी खेड्याचे



Scanned with OKEN Scanner

दृश्यरूप बदलले. मोबाईल-डीश टिव्ही यातून आलेली समाजमाध्यमे आणि चॅनल संस्कृतीने ग्रामीण जीवनातील मूल्यव्यवस्थेवर आघात केला. या बदलत्या मूल्यव्यवस्थेसंबंधी अनिल पाटील लिहितात, ''पूर्वीच्या काळात जसे 'सत्यमेव जयते' हे सुभाषित सर्वत्र असायचे तसे 'राखेल तो चाखणारच' हे सुभाषित सध्या त्याची जागा घेणार की काय असे वाटते. हा ॲटिट्युड सुद्धा ग्रामीण संस्कृतीचाच एक भाग आहे.''[४] यांसह अनेकविध कारणांनी या काळातील ग्रामजीवनाचे सांस्कृतिक विश्व कमालीचे बदलले. त्यातून नवे संस्कृती वास्तव आकाराला आले.

या पार्श्वभूमीवर नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतून 'संस्कृतीभान' कशाप्रकारे प्रकटले आहे. त्याचा शोध घ्यावयाचा आहे.

॥५॥

नव्वदोत्तर काळात अनेक जुने-नवे कादंबरीकार ग्रामीण कादंबरी लिहिताना दिसतात. नव्वदोत्तर काळात उदयाला आलेल्या नव्या ग्रामीण कादंबरीकारांच्या पिढीसोबतच ज्यांनी नव्वदपूर्व काळात कादंबरी लेखन करून आपला ठसा उमटविला व नव्वदोत्तर काळातही ग्रामीण संस्कृतीभान आपल्या कादंबऱ्यांतून प्रभावीपणे प्रकट केले, अशा कादंबरीकारांच्या कादंबऱ्याही प्रस्तुत विवेचनाच्या कक्षेत सामावून घेतलेल्या आहेत. राजकारण, आधुनिकता आणि जागतिकीकरणाने बदललेल्या ग्रामसंस्कृतीचे भान नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीच्या तळाशी आहे. नव्वदोत्तर सामाजिक-सांस्कृतिक ग्रामजीवनाचे 'संस्कृतीभान' याच प्रवृत्तीमुळे वेगळे ठरलेले आहे. या प्रवृत्तींच्या परिप्रेक्षात नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील 'संस्कृतीभाना'चा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विवेचनात ज्या कादंबऱ्यांचा निर्देश केलेला आहे; त्या कादंबऱ्या प्रातिनिधिक स्वरूपात घेतलेल्या आहेत. येथे नव्वदोत्तर काळातील सर्वच ग्रामीण कादंबऱ्यांचा उल्लेख केलेला नाही. नव्वदोत्तर काळातील ग्रामीण सांस्कृतिक विश्व राजकारण, आधुनिकता आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे बदललेले आहे. पारंपरिक गावगाडा, कुटुंब, जात, धर्म, शिक्षण, पर्यावरण, प्रशासन आदींच्या स्थित्यंतराच्या मुळाशी कमी-अधिक फरकाने हेच तीन घटक असल्याचे दिसते. त्या प्रभावातूनच या काळातील ग्रामीण कादंबरी आकारलेली दिसते.

नव्वदोत्तर काळात ग्रामजीवनातील बदलत्या राजकीय संस्कृतीचा वेध ग्रामीण कादंबरीने घेतलेला आहे. रा. रं. बोराडे यांच्या या काळात 'आमदार सौभाग्यवती' व 'नामदार श्रीमती' या कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. पण या कादंबऱ्या राजकीय डावपेचात आडकल्याने ग्रामसंस्कृती ही पार्श्वभूमीदाखल



Scanned with OKEN Scanner

या कादंबरीतून येते. रंगनाथ पठारे हे या काळात महत्त्वाची कादंबरी लिहिताना दिसतात. 'ताम्रपट' (१९९४) ही त्यांची कादंबरी बदलत्या ग्रामीण राजकीय सत्ता-संस्कृतीचा वेध घेते. नव्वदोत्तर ग्रामीण राजकारण समग्रतेसह कवेत घेऊ पाहणारी एक श्रेष्ठ कादंबरी म्हणून या कादंबरीचा निर्देश करावा लागेल. ही कादंबरी समकालीन ग्रामीण राजकीय संस्कृतीवास्तवाला थेट भिडताना दिसते. एकाच कुटुंबातील सत्तासंघर्षाचा वेगळा पट मांडणारी भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ' (२००१) ही या काळातील महत्त्वाची कादंबरी आहे. कुटुंबप्रमुखांचे हेवेदावे-ताणतणाव आणि त्यासोबतच सत्ता नि पैशामुळे पारंपरिक कौटुंबिक धारणेला छेद देत अनीतीच्या मार्गाने जाणारा कुटुंबप्रमुख यातून उभा राहतो. मालकी हक्काचे पारंपरिक संस्कृतीदर्शनही यातून घडते. १९५७ नंतरच्या मातंग समाजाच्या तीन पिढ्यांचे चित्रण बाबाराव मुसळे यांनी 'वारूळ' (२००४) कादंबरीतून केले आहे. गाव-गावकी-भावकीसह समाजपरिवर्तनाच्या चळवळी आणि मतासाठीचे राजकारण या कादंबरीतून आले आहे.

मोहन पाटील यांनी 'लिगाड' आणि 'खांदेपालट' (१९९१) या कादंबऱ्यांतून ग्रामपंचायतीतील दलित सत्तेविषयीच्या राजकारणाचे चित्र मांडले आहे. योगीराज वाघमारे यांची 'सभापती' ही कादंबरीही ग्रामीण राजकीय संस्कृतीला असणाऱ्या विविध संदर्भाचे भान उजागर करते. गावपातळीवरील बदलत्या राजकारणाची जाणीव बाबाराव मुसळे यांच्या 'पाटीलकी'मधून व्यक्त होते. ऱ्हासशील राजकारणाचे अत्यंत प्रभावी चित्रण गणेश आवटे यांनी 'भिरूड' (२००५) कादंबरीतून केले आहे. राजकारणातील जातीयता, जातवार संघटना, दिशाहिन जातीय गट, वर्गीय समूह अस्मिता आणि यांच्या एकत्रित परिणामातून ग्रामसमूहांचे-माणसांच्या होणाऱ्या शोषणाचा आलेख यातून उभा राहतो. कृष्णात खोत यांनी मूल्यभ्रष्ट राजकारणाचा वेध 'रौंदळा'(२००८) कादंबरीतून घेतलेला आहे. प्रदीप धोडींबा पाटील यांची 'गावकळा' (२०१७) ही कादंबरी गाव आणि गावाची कळा सशक्तपणे मांडताना दिसते. गावातील बीभत्स, द्वेषमय व आकसयुक्त राजकारणाचा फटका विकासाला कसा बसतो, याचे वर्तमान या कादंबरीतून उजागर होते.

॥ ६ ॥

कुटुंबव्यवस्था आणि शेती-माती नि कुटुंबाला बांधलेली स्त्री यामुळे ग्रामसंस्कृती वेगळी ठरलेली आहे. या दोहोंनाही ग्रामीण कादंबरीने आविष्कृत केलेले आहे.

ग्रामीण 'कुटुंबसंस्कृती'चे 'कुटुंबचित्रण' करणे हा साठोत्तर ग्रामीण



Scanned with OKEN Scanner

कादंबरीचा मूल स्वभाव राहिलेला आहे. नव्वदोत्तर काळातही ही परंपरा प्रवाहित होताना दिसते. या काळातील ग्रामीण कादंबरीतील 'कुटुंबचित्रणा'वर 'आधुनिक' जाणिवेचा प्रभाव आहे. ग्रामीण जीवनाच्या वाटचालीत अनेक शतके स्थिर असणारी एकल वा एकत्रित ग्रामकुटुंबे साठोत्तर काळात विस्कटायला लागली. नव्वदोत्तर काळात खेड्यापर्यंत पाझरलेल्या 'आधुनिकीकरणाने' नवे ताण ग्रामीण कुटुंबांमधे निर्माण केले. त्यातून कुटुंबातील पारंपरिक भावबंधाची संस्कृती लोप पावून नवा कुटुंब संघर्ष नि संस्कृती आकारली आहे. ग्रामीण समाजातील शेती-मातीशी निगडित बदलत्या बाह्य संस्कृतीचा दाब या कुटुंबावर कसा आहे. याचे चित्रण या काळातील ग्रामीण कादंबरीतून आलेले दिसते. या कुटुंबांचे व्यवस्थेशी असणारे ताणताणावही अधोरेखित होतात. या कादंबऱ्या विशिष्ट कुटुंबाचे चित्रण करत असल्या तरी शेतकरी कुटुंबांचे दुःख, त्यांचे प्रश्न आणि शोषणाची जाणीवही ठळक करतात. भीमराव वाघचौरे 'रानखळखी' (१९९०), रविंद्र शोभणे 'कोंडी' (१९९२), शेषराव मोहिते 'असं जगणं तोलाचं' ( १९९४) व 'धूळपेरणी' (२००१) या कादंबऱ्या कुटुंब आणि त्याभोवतीच्या सांस्कृतिक पर्यावरणाचा वेध घेताना दिसतात. सुरेंद्र पाटील यांच्या 'चिखलवाटा' (२००८) कादंबरीतून कर्जमुक्तीचं स्वप्न पाहणाऱ्या शेतकरी संघटनेच्या निष्ठावंत कार्यकर्त्याची आणि त्यातून कुटुंबात निर्माण झालेल्या संघर्ष-ताणाचे कथन साकारते. प्रामाणिक कार्यकर्त्याचे कुटुंबाकडे होणारे दुर्लक्ष, बायकामुलांची होणारी परवड आणि घरातील आर्थिक-मानसिक संघर्षाचा सुरेख पट या कादंबरीने उभा केला आहे.

कृषीव्यवस्थेतील भारतीय स्त्रीचे जीवन हे परंपरानिष्ठ आणि बारोमास दारिद्र्याला बांधल्याचे वास्तव सार्वत्रिक आहे. तिच्या सर्जनशीलतेतून आणि अविरत कष्टातून कृषीसंस्कृती आकाराला आलेली आहे. तिचे संवर्धन आणि विकासशीलतेतही तिचा मोलाचा वाटा आहे. मातीत टिकवून राहत चिवटपणे रात्रंदिवस मूकपणे जगण्याशी संघर्ष करत राहणे हे तिचे प्राक्तन आहे. हे जगण्याचे बळ तिला याच परंपरेतील सांस्कृतिक संचितातून आलेले आहे. याच कारणाने ग्रामीण स्त्रीची संस्कृती अन्य भारतीय स्त्रियांच्या संस्कृतीपेक्षा वेगळी ठरते. स्त्री म्हणून आणि ग्रामीण स्त्री म्हणून अशा पुरुषसत्ताक नि ग्रामसंस्कृती निर्मित दुहेरी शोषणाला तिला सामोरे जावे लागते. या स्त्रीचे संस्कृतीभान 'धग', 'पाचोळा' व अन्य कादंबऱ्यांतून साठोत्तर काळात अधोरेखित झाले आहे. नव्वदोत्तर काळात गावगाड्याच्या चौकटीसह नव्या पेचांना सामोरी जाणारी खेड्यातील स्त्री मराठी कादंबरीतून चित्रित झाली आहे. एका बाजूला नव्वदोत्तर काळात समग्र व्यवस्था



Scanned with OKEN Scanner

कूस बदलते आहे; पण ग्रामीण स्त्रीच्या जगण्यात परिणामकारक बदल होताना दिसत नाही. याचेही सूचन नव्वदोत्तर कादंबरी करताना दिसते. स्त्री शोषणाच्या जुन्या-नव्या मितीचा संकर नव्वदोत्तर ग्रामविश्वात दिसतो. त्याचे पडसाद कादंबरीतून उमटले आहे. ग्राम संस्कृतीत स्त्रियांचे स्थान दुय्यम दर्जाचे आहे. या दुय्यमपणाच्या संस्कृतीला नव्वदोत्तर कादंबरीकारांनी मुखरित केले आहे.

स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे नि तिचे स्थान ग्रामीण कुटुंबात मोलकरणीसारखे असल्याचा आशय प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई' कादंबरीतून उजागर होतो. त्यांच्या 'पार्टटाईम' (२००२) कादंबरीतून स्त्री कितीही शिकली तरी ती पुरुषापेक्षा समाजाच्या दृष्टीने दुय्यमच असते, ही जाणीव व्यक्त करते. यातून पुरुषी संस्कृतीचे वर्चस्वभान ठळक होते. कृष्णात खोत यांची 'गावठाण' (२००७) या कादंबरीची नायिका एकाच वेळी परिस्थिती आणि नियतीशी संघर्ष करत राहते. 'आनंदी' या नायिकेचा विधवा होईपर्यंतचा शोकात्म प्रवास या कादंबरीतून येतो. पारंपरिक व्यवस्था आणि शिक्षणासाठी चाललेल्या धडपडणाऱ्या मुलीची गोष्ट बालाजी मदन इंगळे 'झिम पोरी झिम' (२००९) मधून ठळक करतात. शांता जोशी यांची 'गव्हानी' (२०००) ही कादंबरी उसतोड कामगाराच्या मुलांची शिक्षणाची होणारी परवड आणि प्रतिकुल परिस्थितीत शिक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या सुशीलेची कहाणी मांडते. यातून खेड्यातील अभावग्रस्तांच्या शिक्षणाचे चित्र स्पष्ट होते. मथू सावंत यांनी 'राहू केतू' (१९९९) कादंबरीतून राजकारणात येऊ पाहणाऱ्या खेड्यातील स्त्रीची घुसमट आणि जिल्हा परिषदेतील गलिच्छ राजकीय संस्कृतीचा वेध घेतला आहे. बाबु बिरादार हे नव्वदोत्तर मराठी कादंबरीत मौलिक भर घालणारे नाव आहे. त्यांची 'संभूती' (२००४) ही कादंबरी ग्रामीण स्त्रीचा वैश्विक पातळीवर वेध घेते. भारतीय मातृसत्ताक व्यवस्थेशी या स्त्रीचे नाते जोडत समकालीन पुरुषी वर्चस्वातील तिच्या शोषणाचे प्रारूप अधोरेखित करते.

॥ ७ ॥

जागतिकीकरणासह नापिकी, दुष्काळ, अतिवृष्टी, शेतमालाच्या किंमती यामुळे निर्माण झालेल्या अडचणी; त्यातून वाढत गेलेले कर्जबाजारीपण-दारिद्र्य या कारणांनी नव्वदच्या दशकानंतर 'शेतकरी आत्महत्यां'चे भयावह वास्तव समोर आलेले आहे. १९ मार्च १९८६ ला यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील चिलगव्हाणच्या साहेबराव करपे यांनी त्यांची पत्नी मालती आणि मुलांसह सहकुटुंब आत्महत्या केली. ही महाराष्ट्रातील कर्जबाजारी शेतकऱ्याची पहिली वैयक्तिक आणि सामुहिक आत्महत्या आहे.

गेल्या तीस वर्षात भांडवली अर्थकारणाच्या नितीमुळे देशात जवळपास साडेतीन लक्ष आणि एकट्या महाराष्ट्रात पंच्याहत्तर हजार शेतकऱ्यांनी जगण्याला कंटाळून जीवन संपवले आहे. 'बळीराजा' असा त्याचा होणारा गौरव आत्महत्यांच्या या वास्तवाने हास्यास्पद ठरला आहे. अन्न पिकवणारी हाडामासाची जिवंत माणसं मरणाला मिठी मारत आहेत आणि आमची व्यवस्था याकडे संवेदना बधीर झाल्यागत कृतीशून्यपणे बघते आहे. 'शेतकरी आत्महत्यांच्या वास्तवाने घडलेल्या

संस्कृतीभानाचे प्रभावी चित्रफलक सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' (२००२) कादंबरीतून उभा राहतो. नव्वदोत्तर ग्रामीण जीवनातील बेरोजगारी, बेकारी, नापिकी, कर्जबाजारीपण, आस्मानी-सुलतानी संकटे, शिक्षण, राजकारण, आधुनिकता, दारिद्र्य, अंधश्रद्धा, ग्रामीण माणसांची मानसिकता अशा बहुविध कारणांचा शोध घेत देशमुख शेतकरी आत्महत्येचे वास्तव उजागर करतात. आनंद विंगकर हे या काळातील महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' (२०११) ही कादंबरी आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील वास्तवाचा अन्वयार्थ लावत त्याच्या वर्तमान वाटचालीचे सूचन करते. अशोक कौतिक कोळी यांच्या 'पाडा' (२००३)या कादंबरीतून शेतमालाच्या भावाचा प्रश्न अधोरेखित होतो. जागतिकीकरणाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या वास्तवाचे संवेदन या कादंबरीने ठळक केले आहे. 'कापूसकाळ' ही कैलास दौंड यांची कादंबरी कापूस पीक आणि त्या अनुषंगाने येणारे वास्तव अधोरेखित करते. त्यातूनही व्यवस्थेची शेतमाल विक्रीची अनास्था ध्वनित होते.

आधुनिकीकरण-जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकासाच्या नावाखाली ग्रामीण जीवनाचे विस्थापन होते. हे विस्थापन कसे खेड्याच्या सांस्कृतिक जीवनाला उद्ध्वस्त करते, याचे चित्रण या काळातील कादंबरीतून आले आहे. विश्वास पाटील यांच्या 'झाडाझती'सोबतच हा प्रश्न इतरही लेखकांनी हाताळलेला आहे. मोहन पाटील यांची 'बस्तान' (१९९७) आणि शंकर सखाराम यांच्या 'एसईझेड' (२००७) या कादंबऱ्यांतून हे वास्तव आले आहे. शहरीकरणामुळे शहरांच्या भोवती असणाऱ्या खेड्यांचे अस्तित्व कसे धोक्यात येते हे 'बस्तान'मधून तर 'सेझ'च्या नावाखाली शेतकऱ्यांच्या काळ्या पिकाऊ जमिनी काढून घेत त्यांना कसे उजाड केले गेले याचे चित्रण 'एसईझेड'मधून येते. नव्वदोत्तर काळातील एकूण मराठी कादंबरीत आपला ठसा उमटविणारा



Scanned with OKEN Scanner

कादंबरीकार म्हणून प्रवीण बांदेकर यांचा निर्देश आवश्यक आहे. त्यांची सेझ आणि त्यातून उभे राहिलेले राजकारण-समाजकारण यांचा वेध घेणारी 'चाळेगत' (२००९) ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रामसंस्कृतीतील मूल्यऱ्हासाचा नकाशा या कादंबरीने रेखाटला आहे.

कोकणातील दशावतारामधल्या संकासूराच्या निवेदनपद्धतीतून साकारलेली त्यांची ही कादंबरी कोकणच्या भू-जैविक शोषणाचे सार्वत्रिक असणारे वास्तव प्राधिनिधिक स्वरूपात अधोरेखित करणारी आहे. भूमिपूत्र-मच्छीमारांचे विस्थापन या आशयसूत्राला केंद्रवर्ती ठेवत ही कादंबरी आकारते. त्यासोबतच परिवर्तनवादी चळवळींचे संपत जाणे आणि जातीयवादी संघटनांचे फोफावणे, विवेकशून्य राजकीय पक्षांचे प्राबल्य वाढत जाणे आणि समाजविकासी मूल्यांचा अवकाश संकुचित करणाऱ्या प्रवृत्तींना बळ देणाऱ्या व्यवस्थेचा शिरकाव होणे याचेही सूचन यातून येते. या संक्रमणाने संभ्रमित झालेली तरुणाई व या सर्व आक्रमणाकडे पाठ करून उभा असलेला बुद्धिजीवी वर्ग या वास्तवाला ही कादंबरी मुखरीत करते. स्थलांतरित शेतमजूर शेतकऱ्यांचा प्रश्न मांडणारी भीमराव वाघचौरे यांची 'गराडा' (२००२) ही कादंबरीही विस्थापितांची परवड मांडणारी महत्त्वाची कादंबरी आहे. सीताराम सावंत यांची 'देशोधडी' (२०१०) ही कादंबरी खेड्यातील नव्या शिक्षित पिढीचे शहराकडे होणाऱ्या स्थलांतराचा वेध घेते. राजन गवस यांच्या 'ब-बळीचा' (२०१२) या कादंबरीमधून जागतिकीकरणानंतरच्या शेतीच्या पडझडीचे-लुटीचे संस्कृतीवास्तव अधोरेखित झालेले आहे.

जागतिकीकरणाने बदललेल्या खेड्यातील सांस्कृतिक स्थित्यंतराचे सजग भान महेंद्र कदम यांच्या कादंबऱ्यांतून प्रकटले आहे. 'धूळपावलं' (२००९) ही त्यांची पहिली कादंबरी. वर्तमान गाव आणि त्यातील राजकारण-जातकारणाने विदीर्ण झालेला, भयभित झालेला सर्वसामान्य माणूस या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. बदलत्या वर्तमानात तगून राहणाऱ्या धनू शेळकेची गोष्ट यातून साक्षात होते. 'आगळ' (२०१२) ही त्यांची दुसरी बहुचर्चित कादंबरी. 'आगळ'मधून त्यांनी समकालीन सांस्कृतिक वास्तवाचा लेखाजोखा मांडलेला आहे. सोलापूर आणि परिसराचा भाषिक प्रदेश कवेत घेत ही प्रयोगशील कादंबरी साकारली आहे. मकरंद सराटे या पात्राचे अनुभवविश्व प्रकट करत अकारलेली ही कादंबरी वर्तमान माणसांसमोरील पेच आणि ग्रामीण-अर्धनागरी जगाच्या पडझडीची गोष्ट मुखरित करते. त्यांची 'तणस' (२०१९) ही तिसरी कादंबरी नवभांडवली व्यवस्थेने येथील सर्वहारा वर्गाचा जीवनरस शोषून घेत त्याला कसे कुपोषित केले, त्याच्या



Scanned with OKEN Scanner

जगण्याचा कसा कचरा केला या वास्तवाचे अधोरेखन करते. माणसासोबतच सामाजिक व्यवस्थांचेही 'तणस' झाल्याची जाणीव ही कादंबरी ठळक करते. हा काळ कसा घडत-बिघडत गेला याचा आलेखपट या कादंबरीतून उभा राहतो. चळवळीला केंद्रस्थानी ठेवून आकारलेली आसाराम लोमटे यांची 'तसनस' (२०२०) ही कादंबरी जागतिकीकरणानंतर शेती-शेतकऱ्यांच्या संस्कृतीत झालेल्या बदलासह या जगण्यातील ताण्याबाण्याला शब्दबद्ध करते. सशक्त कथा लिहिणारे लोमटे कादंबरीतूनही तितक्याच ताकदीने ग्रामसंस्कृतीचे झिजत जाणे अधोरेखित करतात.

पर्यावरणाचा विनाश आणि त्यातून निर्माण झालेल्या दुष्काळाच्या मानवनिर्मित वास्तवाने नव्वदोत्तर ग्रामसंस्कृतीला भारित केलेले आहे. त्यातून उद्भवलेला 'पाण्याचा' प्रश्न या काळात दाहक बनलेला आहे. 'दुष्काळ' आणि 'पाणी' यांनी नव्वदोत्तर काळात अर्ध्या-अधिक ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनावर प्रभाव टाकलेला आहे. या प्रभावाचे संवेदन या काळातील कादंबरीने प्रकट केले आहे. बाबाराव मुसळे यांनी 'पखाल' (१९९५) कादंबरीतून पाण्याने उभ्या केलेल्या संगराचा वेध घेतला आहे. बदलत्या संस्कृतीने कोळी समाजासमोर निर्माण केलेले प्रश्न आणि पाण्याच्या अनुषंगाने येणारा अंतर्गत कलह, द्वेषभाव, कारस्थाने, हेवेदावे, ताणतणाव, जातीयता यांचा आलेखपट या कादंबरीने साक्षात केला आहे. विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' आणि 'झाडाझडती' या दोन महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. विश्वास पाटील यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून पाण्याचे नसणे, पाण्याचा होणारा दुरूपयोग आणि पाण्यामुळे होणाऱ्या विस्थापनाची जाणीव अत्यंत नेमकेपणाने व्यक्त केलेली आहे. पाण्याने ग्रामीण जगण्याची कशी वाताहत केली याचे दर्शन त्यांच्या कादंबऱ्यांतून घडते. त्यामुळे बदललेल्या ग्रामीण संस्कृतीचाही वेध ते घेतात. 'पाणी' या विषयावरची नव्वदोत्तर काळातील सर्वोत्तम कादंबरी म्हणून सदानंद देशमुख यांच्या 'तहान' (१९९८) चा निर्देश आवश्यक ठरेल. पाणी टंचाईच्या काळात विविध पातळ्यांवर आपली तहान भागविणाऱ्या मानसिकतेचा आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्याने घडवलेल्या सांस्कृतिक वास्तवाचा वेध देशमुख घेतात.

॥८॥

नव्वदोत्तर काळात खेड्यातील जात-धर्म, रूढी-प्रथा आणि नव्या शैक्षणिक वास्तवाने ग्रामसंस्कृतीला नवे वळण दिले आहे. या काळात जात-धर्मवास्तवाचे विखारी रूप समोर आले आहे. जात-धर्म जाणिवा अधिक प्रखर



Scanned with OKEN Scanner

होत गेल्या. दलित-सवर्णांचा नवा संघर्ष या काळात समोर आला. राजन गवस यांनी 'तणकट' (१९९८) मधून हा संघर्ष उजागर केला आहे. सोबतच दलित चळवळीतील आंतर्विरोधाने नव्वदोत्तर काळात कोणते रूप धारण केले आहे, याचेही सूचन केले आहे. राजन खान यांनी 'हयात आणि मजार' (१९९५) या कादंबरीतून मुस्लिम समाज आणि या समाजातील स्त्रियांच्या संस्कृतीचे चित्र रेखाटत धर्माच्या ठेकेदारांचा स्वार्थ उघड केला आहे. त्यांच्या 'जातवन' मधून त्यांनी दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण केले आहे. जात संस्कृती चित्रणाची वेगळी वाट चोखाळत कादंबरीलेखन करणारे कादंबरीकार म्हणून नामदेव कांबळे या कादंबरीकाराचा निर्देश करावा लागतो. त्यांच्या 'राघववेळ' (१९९५), 'उनसावली' (१९९७) आणि 'सांजरंग' (१९९९) या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. या तीनही कादंबऱ्यातून मातंग समाजातील एका कुटुंबाची कहाणी प्रकट झाली आहे. वैदर्भीय पार्श्वभूमीवर साकारलेल्या या कादंबऱ्या मातंग समाजाच्या अवकाशात ग्रामीण स्थितीशील-परंपराप्रिय संस्कृतीचा वेध घेतात. 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या' (२०१७) या प्रवीण बांदेकर यांच्या कादंबरीतून सांस्कृतिक शोषणाचा वर्तमान कोकणामधील कथेकरी ठाकर समूहाच्या कळसूत्री बाहुल्यांच्या निवेदन तंत्राधारे रेखाटला आहे. धार्मिक संस्थांच्या कारवाया आणि सामान्य माणसांचे मनोनियंत्रण करून धर्मांध मूलतत्त्ववाद रूजवण्याचा सनातन्यांच्या चाललेल्या प्रयत्नांचे दर्शन ही कादंबरी घडविते. जाणीवपूर्वक बुद्धिभेद करून बहुजनांच्या वैचारिकतेचा स्मृतिभ्रंश कसा घडवला जात आहे. विवेकवादी विचारपरंपरेला आव्हान देत धर्मरक्षणाच्या भावनिक कोंदणात बसवून समाजाला कशी धर्मगुंगी आणली जाते आहे. त्याच आधारावर सामान्यांना ताब्यात घेऊन आपली वर्चस्ववादी परंपरा लादण्याचे सनातन्यांचे इरादे आणि स्वविश्वापुरता विचार करत बुद्धिवंतांचे सोयीस्करपणे याकडे होणारे दुर्लक्ष या आशयसूत्राभोवती या कादंबरीचे कथानक उभे राहते. भूत-वर्तमानातील सांस्कृतिक संघर्ष आणि समाजाच्या भविष्य वाटचालीचे सूचन ही कादंबरी करते.

ग्रामीण समाज हा अनिष्ट रूढी-प्रथांना कवटाळत जगणारा समाज आहे. नव्वदोत्तर काळात एका बाजूला आधुनिक मूल्यव्यवस्था व नव विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रभाव सर्व समाजव्यवस्थेवर असताना ग्रामीण समाज मात्र त्याची सनातन जीवनरीत टाकायला तयार नाही. याचे चित्रण काही कादंबऱ्यांमधून आलेले दिसते. उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा' (१९९६) ही कादंबरी या दृष्टीने लक्षणीय आहे. दक्षिण महाराष्ट्रातील देवदासी, जोगतिणी, जोगत्या म्हणून सोडलेल्या



Scanned with OKEN Scanner

मुली-मुलांचे भावविश्व या कादंबरीतून प्रकटले आहे. त्यांचा माणूस म्हणून जगण्याचा हिरावून घेतलेल्या हक्काची जाणीवही यातून अधोरेखित होते.

नव्वदोत्तर काळात ग्रामजीवनात मोठे शैक्षणिक स्थित्यंतर घडून आले. शिक्षणाचा विस्तार झाला; परंतु शिक्षण क्षेत्रातील अनीती समोर आली. शिक्षणाचे झालेले बाजारीकरण, संस्थाचालकांचे झालेले संस्थानिक, विनाअनुदान धोरणांमुळे शिक्षकांचे होत असलेले शोषण, परीक्षेतील गैरप्रकार, शिक्षण क्षेत्रात वाढलेला भ्रष्टाचार अशा अनेकविध कारणांनी या काळात नवी शैक्षणिक संस्कृती निर्माण झाली. तिचा वेध मराठी कादंबरीने घेतलेला आहे. या संदर्भात रमेश सूर्यवंशी यांची 'प्रांजल' (१९९९) आणि योगिराज वाघमारे यांची 'शिक्षणनामा' (२००४) या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. ग्रामीण भागातील निरक्षरांना साक्षर करण्यासाठी राबवलेल्या साक्षरता अभियानाचा शासकीय कर्मचाऱ्यांनी कशाप्रकारे खेळखंडोबा केला, याचे वास्तव रमेश इंगळे उत्रादकर यांच्या 'निशाणी डावा अंगठा' (२००५) मध्ये येते; तर त्यांच्या 'सर्व प्रश्न अनिवार्य' (२०११) या प्रयोगशील कादंबरीतून शिक्षणातील मूल्यऱ्हासाचे संस्कृतीभान प्रकटते. यासोबतच खेड्यातील शिक्षण संस्कृतीवर प्रकाश टाकणारी कादंबरी म्हणून राजेश विश्वनाथ कांबळे यांच्या 'गायरान' (१९९६) या कादंबरीचा उल्लेख आवश्यक आहे.

॥ ९ ॥

नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरीत पोटवर्गसमूहाच्या संस्कृतीचे भान आणि महाराष्ट्राच्या वैविध्यपूर्ण ग्रामबोलीचा सजगपणे आविष्कार झालेले आहे. ही बाब नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीच्या दृष्टीने जमेची आहे. या काळात ग्रामसंस्कृतीतील वर्गसमूह नि पोटवर्गाचे वास्तव मांडण्याचे काही लक्षणीय आविष्कार घडलेले दिसतात. प्रातिनिधिक स्वरूपात काही आविष्कारांचा निर्देश आवश्यक ठरेल. उसतोड कामगारवर्गाचा प्रश्न अधोरेखित करणारी सरदार जाधव यांची 'कोयता' (१९९४) या कादंबरीचा निर्देश आवश्यक ठरेल. विजय जावळे यांची 'लेकमात' ही कादंबरी उसतोड कामगार म्हणून राबणाऱ्या शेतकऱ्याच्या अर्थकारणाचा वेध घेते. अशोक पवार यांच्या 'इळनमाळ' (२००८), 'पडझड' (२०११) आणि 'तसव्या' (२०१३) या कादंबऱ्यांतून भटक्या समूहातील पोटसंस्कृतीचे जीवनव्यवहार प्रकट होतात.

सर्वंकषपणे मराठी कादंबरीच्या कक्षेत न आलेल्या 'भारनियमन' या विषयाला केंद्रस्थानी ठेवून 'विजेने चोरलेले दिवस' (२०२०) ही संतोष जगताप यांची कादंबरी साकारते. विजेमुळे शेती नि शेतकऱ्यांच्या होणाऱ्या परवडीचे



Scanned with OKEN Scanner

जळजळीत वर्तमान या कादंबरीतून अधोरेखित झाले आहे. एकूण भारनियमन आणि शेतकरी हा विषय या कादंबरीच्या केंद्रस्थानी असला तरी अल्पभूधारक शेतकरी वर्गाचे वास्तव यातून ध्वनित होते. नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' (२०१७) या कादंबरीतून अल्पभूधारक शेतकरी अधिक शेतमजूर या शेतीवर्गसमूहातील तरुण आणि त्याच्या कुटुंबांच्या अभावमय जगण्याचे संघर्षकथन प्रकट झाले आहे. अनिल सपकाळ यांची 'भडास' (२०००) ही कादंबरी शेतमजूर या वर्गसमूहाची जाणीव व्यक्त करणारी आहे. गावगाड्यात सामाजिक दृष्ट्या अलुतेदार-बलुतेदारांना हीन लेखले गेले आहे. 'महार' या बलुतेदार जातीला गावगाड्यात सर्वाधिक छळाला सामोरे जावे लागले आहे. या कादंबरीतून हीच जाणीव ठळक होत दलित-सवर्ण समूहाच्या संबंधरचनेची उतरंड उभी राहते. त्यातून पूर्वापार चालत आलेल्या गावगाड्याच्या रचिताचे वास्तव उघड होते. हे रचित ग्रामीण समाजातील दोन समूहांच्या संस्कृतीभेदाचे वर्तमान वास्तव अधोरेखित करणारे आहे. उसतोड कामगाराच्या कुटुंबात जन्मलेल्या नायकाचा संघर्ष ज्ञानेश्वर प्रकाश जाधवर यांच्या 'यसन' (२०१९) या कादंबरीतून उजागर होतो.

भाषा ही सर्व सामाजिक व्यवस्थांशी जोडलेली सामाजिक संस्था आहे. भाषा हा संस्कृतीचा महत्त्वाचा विशेष आहे. भाषा-संस्कृती आणि साहित्य यांचे जैविक स्वरूपाचे नाते आहे. भाषा हे साहित्याचे माध्यम आणि संस्कृतीचे वहन करणारी संस्था आहे. ना. गो. कालेलकर लिहितात, ''जीवनातल्या व्यवस्थित, सर्वांना आदरणीय आणि आवश्यक अशा सवयींचा आविष्कार करणारी संस्कृती आणि तेच जीवन आणि त्याची सर्व अंगे श्रुतीगोचर करणारी भाषा या दोन्ही व्यक्तिजीवनातून प्रकट होतात.''[५] व्यक्तिजीवन-सांस्कृतिक जीवन हे साहित्याचे आशयद्रव्य असते. त्यामुळेच साहित्याच्या भाषेतून त्या-त्या समूहाचे 'संस्कृतीभान' प्रकट होत असते. ''कादंबरीतून अभिव्यक्त होणारे आशयद्रव्य विशिष्ट समाजजीवनातून येते. ते ज्या समाजजीवनातून घेतले जाते त्या समाजाची भाषाही आशयद्रव्याबरोबर कादंबरीत येते.''[६] म्हणूनच कोणत्याही कादंबरीचा आशय आणि भाषा यांचा सुटा-सुटा विचार करता येत नाही. त्यांच्यात सेंद्रीयत्व असते. त्यामुळे कादंबरीतून प्रकटणाऱ्या आशयाप्रमाणेच भाषा हा घटकही विशिष्ट समूहाचे 'सांस्कृतिक भान' व्यक्त करत असते. ग्रामीण साहित्याचा आशय आणि भाषा हे दोन्ही घटक निराळे आहेत. त्यामुळेच ग्रामीण कादंबरीतून आलेल्या भाषेला सांस्कृतिक महत्त्व आहे. नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीतून भाषिक



Scanned with OKEN Scanner

संस्कृती संचित आधिक्याने आलेले आहे. महाराष्ट्रातील विविध प्रदेशातील प्रदेशनिविष्ट भाषा आणि समाजविशिष्ट भाषेचा आविष्कार या कादंबरीतून घडलेला आहे. उदाहरणादाखल काही कादंबरीकारांचा निर्देश करता येईल. मराठवाड्यातील ग्रामीण बोलीचा आविष्कार भीमराव वाघचौरे, शेषराव मोहिते, भारत काळे, बालाजी मदन इंगळे आदींच्या कादंबरीतून झालेला दिसतो. बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, रविंद्र शोभणे इत्यादींच्या कादंबरीतून विदर्भाच्या बोलीचा; तर अशोक कौतिक कोळी यांच्या कादंबरीतून खानदेशच्या ग्रामभाषेची अभिव्यक्ती झालेली दिसते. राजन गवस, उत्तम बंडू तुपे, नवनाथ गोरे, संतोष जगताप आदींच्या कादंबऱ्यांतून पश्चिम महाराष्ट्र आणि प्रवीण बांदेकर व अन्य कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांतून कोकणच्या बोलीचा समर्थ आविष्कार घडलेला आहे. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतून आलेल्या भाषेत वैविध्य आहे. या भाषेतून ग्रामीण लोकसंचित-लोकमानस प्रकटलेले आहे. म्हणून या भाषेला सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व आहे.

॥ १० ॥

नव्वदोत्तर काळात बदलत्या ग्रामसंस्कृतीवास्तवाला विविध कोनातून भिडण्याचा प्रयत्न कादंबरीकारांनी केलेला दिसतो. बदलत्या कृषीसंस्कृती रेखाटनाचे अनेकविध आविष्कार या काळात घडलेले दिसतात. पण संस्कृतीचित्रणाच्या सुट्या-सुट्या प्रयत्नांमुळे समग्रपणाने या काळातील ग्रामसंस्कृतीस्वभाव कादंबरीतून प्रकट होताना दिसत नाही. या कादंबरीतून ग्रामीण जगण्यातील पोटसंस्कृती-पोटवर्गसमूह आणि त्यांच्या भाषेचा नेटका आविष्कार झालेला आहे. परंतु संस्कृतीवास्तव आहे तसे मांडण्याच्या वृत्तीमुळे आणि अतिकलात्मकतेतून आलेल्या अवास्तव आशयामुळे 'कादंबरी' म्हणून असणारी कलात्मक उंची गाठण्यात ही कादंबरी कमी पडलेली दिसते. अर्थात याला काही कादंबरीकार अपवाद आहेत. संस्कृतीवास्तव मांडताना कलाकृती म्हणून असणाऱ्या मूल्यांकडे या काळातील बहुतेक कादंबरीकारांनी दुर्लक्ष केलेले दिसते. संस्कृतीवास्तवाला आशयकेंद्र बनवत कलामूल्यांचेही भान ठेवणे आवश्यक आहे. संस्कृतीवास्तवाला कवेत घेत काही कादंबरीकारांनी रचनेचे उल्लेखनीय प्रयोगशील आविष्कार केलेले दिसतात. पण त्याची संख्या कमी आहे. "वास्तव या संकल्पनेत बाह्य जगताचे वस्तुनिष्ठ चित्रण, समाजातील पीडित आणि शोषित वर्गाचे चित्रण, पात्रांच्या मनातील वैचारिक आणि भावनिक कलह, आपल्या भोवतीच्या जीवनाची समग्रता आणि एक समग्रलक्ष्यी दृष्टीकोन यांचा अंतर्भाव होतो."[७]



Scanned with OKEN Scanner

आपल्या भोवतीच्या समग्र जीवनाला कवेत घेणाऱ्या समग्रलक्ष्यी दृष्टीकोनाचाही अभाव नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीत जाणवतो. आजच्या ग्रामसंस्कृती वास्तवाची समग्रता सूचित करणारी एकही साहित्यकृती मराठीत दाखवता येत नाही. सांस्कृतिक वास्तवाला असणाऱ्या बहुमुखी पेचांना तोलून धरत समग्र काळाचे संवेदन व्यक्त करणाऱ्या कादंबरीच्या प्रतिक्षेत मराठी ग्रामीण कादंबरी आहे. सांस्कृतिक अनुभवसंपन्नतेसह समग्रलक्ष्यी कलात्मक अभिव्यक्ती असणाऱ्या ग्रामीण कादंबरी निर्माणाची आवश्यकता आहे. तशा क्षमता शक्यता असणारे अनेक कादंबरीकार या काळात आधीच्या पिढीपेक्षा गांभीर्याने लेखन करीत आहेत. त्यांच्याकडून समकालीन ग्रामसंस्कृती वास्तवाला कवेत घेणाऱ्या अशा बहुपेडी कादंबरीची आपेक्षा आहे.

**संदर्भ :**


१. मोहन पाटील, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी सुधारित आवृत्ती:१५ ऑगस्ट २००८, पृ. ०३.
२. दत्ता घोलप, मराठी कादंबरी:आशय आणि आविष्कार, अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती:२३ जुलै २०१८, पृ.१५
३. प्रल्हाद लुलेकर, साठेत्तरी साहित्य प्रवाह, भाग-१, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे, पहिली आवृत्ती:२०१४, पृ. २२७.
४. अनिल पाटील, गावगाडा शतकानंतर, मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती:१ डिसेंबर २०१२, पृ. ३४
५. ना.गो.कालेलकर, भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, मार्च १९९९, पृ. ११४
६. नंदकुमार मोरे, समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २७ फेब्रुवारी २०१२, पृ. ८३
७. प्रभा गणोरकर व इतर (संपा.), वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश, जी. आर. भटकळ फाउण्डेशन, मंबई, डिसेंबर २००१, पृ. ३५३.


❑❑❑



Scanned with OKEN Scanner

# २००० नंतरची कविता स्वरूप आणि आकलन



संपादक
डॉ. मारोती कसाब

सहसंपादक
डॉ. अनिल मुंढे

Scanned with OKEN Scanner

ISBN No. 978-81-953976-4-8

# २००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन

संपादक

डॉ. मारोती कसाब

सहसंपादक

डॉ. अनिल मुंडे

प्रकाशक

सिद्धी पब्लिकेशन हाऊस

६२४, बेलानगर, भावसार चौक,

तरोडा (खु.) नांदेड - ४३१ ६०५.

मो. ९६२३९७९०६७

मुद्रक

अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.

मो. ९१७५३२४४३७

प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०२१

सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर

मूल्य : ३००/-

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | दोन हजार नंतरच्या सामाजिक कवितेचे स्वरूप | संतोष मारोती चमकुरे | २२८ |
| ३१. | २००० नंतरच्या कष्टप्रद शेतकरी समूह जीवनाचा वेध घेणारी कविता: हिसाळा | बाळासाहेब निवृत्ती कराड | २३२ |
| ३२. | २००० नंतरची मराठी बालकविता : मराठवाड्यातील बालकवितेच्या संदर्भात | डॉ. गजानन अनंता देवकर | २३९ |
| ३३. | मेलं नाही अजून आभाळ : शेतकऱ्यांना जगण्याचे बळ देणारी प्रेरक कविता | डॉ. विजयकुमार शिवदास ढोले | २४७ |
| ३४. | इंद्रजित भालेरावांच्या 'टाहो' काव्य संग्रहातील शेतकऱ्यांचे आक्रंदन | डॉ. दादाराव गुंडरे | २५४ |
| ३५. | २००० नंतरची आदिवासी कविता | शोभा विठ्ठल सरकुंडे | २६४ |
| ३६. | शिवारातलं पाणी काव्यसंग्रहातील शेतकऱ्यांचे जीवन चित्रण करणाऱ्या कविता | अशोक हणमंतराव पाटील आडलूरकर | २७० |
| ३७. | शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश पेरणारा : कुळवाडी अभंग | प्रा. प्रमोद भ. इंगोले | २७८ |
| ३८. | २००० नंतरच्या विद्रोही कवितेतील सामाजिक जाणिवा (विशेष संदर्भ : मारोती कसाब यांची कविता) | भरत शिवाजीराव गायकवाड | २८५ |
| ३९. | समकालीन अस्वस्थ वर्तमानाचा अचूक वेध घेणारी कविता: 'माझ्या वर्तमानाची नोंद' | प्रा. बालाजी गणपतराव भंडारे | २९२ |
| ४०. | माणसाला अंतर्मुख करणारी कविता: कोरा कागद निळी शाई | प्रा. ज्ञानेश्वर गायकवाड | ३०१ |
| ४१. | २००० नंतरच्या आंबेडकरवादी कवितेची वाटचाल | धनंजय पांडुरंग सोनकांबळे | ३१० |
| ४२. | २००० नंतरच्या मराठी कवितेतील दलित जाणिवा | प्रा. डॉ. अनिल मुंढे | ३१४ |




Scanned with OKEN Scanner

# इंद्रजित भालेरावांच्या 'टाहो' काव्य संग्रहातील शेतकऱ्यांचे आक्रंदन


## डॉ. दादाराव गुंडरे

**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब, जिल्हा उस्मानाबाद पिन** ४१३ ५०७


इंद्रजित भालेराव हे मराठी वाङ्मयातील एक सुप्रसिद्ध असे नाव. त्यांनी कवितेसोबत कादंबरी, चरित्र, वैचारिक, ललित लेखन साहित्य प्रकारात तसेच समीक्षक व काही महत्त्वाचे संपादनपर लेखनही केले आहे. १९९० च्या आसपास मराठी कवितेत काही नव्या दमाचे कवी आले. त्यामध्ये इंद्रजित भालेराव मराठी काव्यप्रांत समृद्ध करणारे वैशिष्ट्यपूर्ण व लक्षणीय कवी आहेत. विशेषत: मराठवाड्याच्या ओल्या मातीत दीर्घ श्वास त्यांच्या कवितेत कोंडलेला आहे. मराठी ग्रामीण बोलीत कविता करणारे एक समर्थ कवी म्हणून अवघा महाराष्ट्र त्यांना ओळखतो. ग्रामीण कवितेच्या प्रांतात कवयित्री बहिणाबाई चौधरी. ग. ह. पाटील, गिरीश, यशवंत, ना. धो. महानोर व विठ्ठल वाघ यांची परंपरा समर्थपणे पुढे नेण्याचे काम केले. अस्सल ग्रामीण जीवनानुभव व जीवन जाणिवांचे प्रकटीकरण केले. शेतकऱ्यास सृष्टीचे सहावे तत्त्व मानणाऱ्या या कवीने पीकपाणी, समरत, आम्ही कावाडाचे धनी, पेरा, दूर राहिला गाव, कुळंबिनीची कहाणी, वेचलेल्या कविता, मुलुख माझा, भूमीचे मार्दव तसेच २००४ साली 'टाहो' या संग्रहाची निर्मिती करून मराठी ग्रामीण कवितेचा प्रांत समृद्ध केला. त्यांनी पीकपाणी, पाऊसपाणी, कष्टकऱ्यांचे दु:ख, भूमीवरील श्रद्धा, आई-वडील, खेडूत माणसे, शेतकरी, श्रद्धा, दुष्काळ, लोकव्यवहार यासारख्या विषयांचे चिंतन कवितेतून मांडले. कवी व त्यांची कविता एकूणच लोकसमूह मनाशी एकरूप होते.

इंद्रजित भालेरावांची कविता शेतकऱ्यांच्या घामात, अश्रूत व रक्तात भिजलेल्या आहेत. अस्सल ग्रामजीवन व शेतकरी जीवनदर्शन खास बोलीभाषेतून घडविणाऱ्या इंद्रजित भालेराव यांच्या कवितेविषयी प्रसिद्ध समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "गेल्या पाव शतकातील सशक्त कवींपैकी इंद्रजीत भालेराव एक महत्त्वाचे नाव आहे. ग्रामीण जीवनातील वेदनेसह सर्व प्रकारच्या जाणिवांचे रंग-गंध अतिशय उत्कटतेने इंद्रजित भालेराव यांच्या कवितांमधून प्रकट होतात." असा यथोचित गौरव केला. तसेच संजय बोरुडे यांनी, "तमाम कास्तकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडणाऱ्या कविता भालेरावांच्या लेखणीतून उतरल्याने मराठी ग्रामीण कविता



Scanned with OKEN Scanner

"टाहो फोडला बापानं
याच दरीत विरला
आत्महत्येचा पहाड
त्याच्या पोटात शिरला"

या सारख्या ओळी अगतिकतेत आकंठ बुडालेल्या शेतकरी बापाच्या आत्महत्येचा प्रसंग अवतीर्ण करतात. या शब्दात शेतकऱ्याचे विराट दुःख मांडले असून दुःखाची सनातन अशी गाथाच कवितेत पहावयास मिळते. पावसाअभावी शेतीची झालेली परवड, 'पिकला काऊस व सुकला पाऊस' या वर्णनानंतर बापाने फोडलेला टाहो दरीत विरून जातो. अर्थात शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेकडे कोणीच लक्ष देत नाही. त्यामुळे अनेकांच्या पोटात घास घालणाऱ्या शेतकऱ्याच्या पोटात आत्महत्येचा पहाड शिरला हे उफराटे वास्तव कळी शब्दात पकडतात. १९८९ साली आंध्रप्रदेशातील वरंगल जिल्ह्यात शेतकऱ्यांची पहिली आत्महत्या झाली. तेव्हापासून आतापर्यंत संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात आत्महत्या झाल्या आहेत. खरे तर शेतकऱ्याची आत्महत्या होणे म्हणजे येथील संस्कृतीची आत्महत्या आहे. १९८९ नंतर वाढत गेलेल्या आत्महत्या अर्थात समकालीन वास्तवाचे भान राखत त्या काळात घडणारे कृषीजीवन सूक्ष्मपणे शब्दबद्ध करण्याचे काम 'टाहो' तून केले. हा टाहो शेतकऱ्याचा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाचा आहे. 'टाहो'त आक्रांतभाव आहे. कमी-अधिक प्रमाणात देशाच्या विविध भागात हीच परिस्थिती प्रकर्षाने नजरेस पडते आहे. विशेषतः १९९० नंतर आलेल्या 'खाऊजा' धोरणाने तर शेतकऱ्यांच्या जीवनात विकट परिस्थिती आली. आत्महत्येचे आकडे फुगू लागले. लोककल्याणकारी राज्य ही संकल्पना मागे पडून केवळ नफेखोरीस महत्त्व आले. त्यामध्ये अन्नब्रह्माची पूजा करणाऱ्या शेतकऱ्यांचे कृषीमूल्य कसे ठरते याचे भानही उरलेले नाही. सामाजिक संवेदनशीलताही दांभिक बनली आहे.

इंद्रजित भालेरावांच्या 'टाहो'त आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचा टाहो आहे. चहूबाजूंच्या क्षितिजांना छेदून तो आकाशभर, शिवारभर पसरतो. आपली असह्य वेदना, कर्जाचे ओझे दूर करण्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला, हातातील विळयाने शेतातील कणसे खुडावीत तसे शेतकऱ्यानी स्वतःचे प्राण खुडले. संपूर्ण देशभर शेतकरी आत्महत्या हा विषय चर्चिला गेला. त्याच्या नावावर राजकारण चालले परंतु मुळापर्यंत जाऊन या आत्महत्येची कारणमीमांसा कुणी करत नाही. शेतकऱ्यांच्या सुखदुःखाशी नाते असणाऱ्या कवीने आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचा टाहो शब्दबद्ध केला. त्याचे शब्द असह्य वेदनेने हळहळले. ते म्हणतात,

"झाडाझाडाला विचारा



Scanned with OKEN Scanner

आत्महत्येच्या कहाण्या
पहाडाला विचारा
माझ्या बापाच्या विराण्या"

विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात आपल्या भारत देशाने खाऊजाचा स्वीकार केला. त्यामुळे देशात बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शिरकाव झाला. देशाची समृद्धी करण्यासाठी जणू याचे आगमन झाल्याचे चित्र रंगवले. शेतकरी त्यास भुलला. कर्जबाजारी झाला. कर्जाचा डोंगर पेलवेना तेव्हा आत्महत्या कडे वळला. दुष्काळ, कर्ज, दारिद्र्य, सावकारी पाशात पुरता अडकलेला बळीराजा आत्महत्येस प्रवृत्त झाला. आपल्या पश्चात काय होईल याचाही विचार केलेला दिसत नाही. तो तर जिवानिशी जातोच पण त्याच्या पश्चात बायको-मुले, गणगोत, गुरेढोरे, शेत-शिवार यांची भयावह स्थिती होते. ज्या झाडाखाली त्यांचा मनभावी प्रणय झालेला असतो. त्याच झाडाच्या फांदीला तो प्रेत होऊन लोंबकळत असतो. त्याच झाडाखाली त्याची पत्नी आज विकल अवस्थेत उभी असते. तिच्या पोटात भीती, असुरक्षिततेचा गोळा असतो. वरील ओळीतून असंख्य शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे संदर्भ लक्षात येतात. शेतात लावलेला ऊस पाण्याअभावी वाळला आणि त्याऐवजी कसेबसे गवत जगले, साळ पोटऱ्यापर्यंत येताच पाऊस गेला. त्याचा अपरिहार्य परिणाम डोंगरदऱ्यात घुमणारा टाहो फोडून शेतकरी आत्महत्या करतो. शेतकरी हा शेवटी पराधीन राहतो. सर्व मार्ग बंद झाल्यास दीर्घ आक्रंदनात स्वतःस संपवतो. हे आजच्या शेतकरी जीवनाचे दाहक वास्तव आहे.

टाहो चे मुख्य सूत्र शेतकऱ्याचे शोषण, हाल हेच आहे. आत्महत्या उद्भवल्या व साथीसारख्या पसरल्या. हालअपेष्टाची परंपरा तशी जुनीच आहे. वामन बळीराजा ही पुराणकथा चिरतरुण असल्याची साक्ष आहे. 'कालच्या वामनाने' कवितेतून पाहावयास मिळते. आत्महत्या केलेल्या किंवा तशी वेळ आलेल्या शोषित व परिस्थितीने गांजलेल्या शेतकाऱ्याशी संवाद साधणाऱ्या २८ कविता या संग्रहात समविष्ठ आहेत. कर्जबाजारी शेतकरी कर्जास कंटाळून आत्महत्या करतो. कर्ज काढले, वाढले म्हणजे ते फेडले पाहिजे. कर्जफेड झाली नाही तर पाप केले असे शेतकरी मानतो.

"आपल्या डोक्यावरच्या कर्जाला
पाप समजणारा पुण्यवंत आत्मा
फक्त तुझाच शरीरात का राहतो?"

असा राजकारण्याविषयी संताप व्यक्त करतात. उपस्थित केलेला प्रश्न शेतकऱ्याचा इमानस उदात्त बनवतो. कर्जबाजारी सगळेच असतात. कर्जही बुडवणाऱ्यांची संख्या मोठी आहे. कर्जबाजारीपणातून राज्य चालवणाऱ्या सरकारची सुद्धा सुटका नाही. मग डोक्यावरच्या कर्जास कंटाळून कर्जाला पाप


Scanned with OKEN Scanner

समजणारा पुण्यवंत आत्मा फक्त शेतकऱ्याच्या शरीरात राहतो का? असा सवाल करतात, सगळ्यांनीच कमरेची सोडून डोक्याला गुंडाळली पण तुलाच डोक्यावरचे कर्ज पाप का वाटते? तूच स्वतःला का संपवतो? अशी विचारणा करतात. तो आपल्या इमानास सोडत नाही तरीही त्याच्या वाट्यास भीषणता का? याच जबाबदार नेते, राज्यकर्ते, सरकारी यंत्रणा की आणखी कोणी हा विचार करायला लावतात. सगळीकडे पाप-पुण्य, नैतिक-अनैतिकतेचे सोयरसुतक न राहिलेली माणसे स्वतःचे उखळ पांढरे करण्याच्या पाठीमागे लागलेली असताना डोक्यावरच्या कर्जाचे ओझे पाप वाटून तो स्वतःला संपवतो. आत्महत्येमागे काही सामाजिक व सांस्कृतिक मूल्यभाव असल्याचे ते सांगतात. युगानुयुगे धरतीस सुफळीत करीत आलास तरी माणसाला कोंभ फुटत नाहीत असेही बोलून दाखवतात.

ज्या बळीराजास धूर्त वामनाने कपटणीती वापरुन पाताळात घातले तोच वामन बळीराजाच्या आत्महत्येस कारणीभूत आहे. आज मात्र वामनाचे स्वरूप बदलले आहे. आज तो आपल्या पावलाने बळीराजास पाताळात गाडत नाही तर बळीराजा स्वतः गाडून घेईल, फासावर जाईल अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. सगळीकडे जागतिकीकरणाचा उदोउदो सुरू असताना आर्थिक डबघाईला आलेला शेतकरी, पुण्यवंत आत्मा स्वतःस संपवतो आहे. आत्महत्या करू पाहणाऱ्या पुढे एक भयंकर भविष्याचे चित्र, दृश्य पुढे उभे करतात.

आत्महत्येची वेळ आनणाऱ्यांचा निषेध करताना इंद्रजित भालेराव म्हणतात,

"दुःख दळून खाणाऱ्याला
आत्महत्येच्या कड्यावर
आणून पोहोचवणारानो
देवाचं जातं दमाण फिरतं
पण फार बारीक दळतं
असं कबीर सांगून गेलाय"

मोठमोठ्या उद्योगपतींनी बँकांची कर्जे बुडवली. त्यालाच कर्जमुक्त केले. परंतु शेतकऱ्याकडून मोठी रक्कम वसूल करूनही कर्जमुक्त केले नाही. ही वस्तुस्थिती सांगताना कवी संतापतो. हे वैश्विक सत्य कबीराच्या दोहयातून सूचित करतात. शेतकऱ्याच्या घामावर आणि त्याच्या दुःखातून सुखी जीवन जगणाऱ्या ऐतखाऊ खुशाल चेंडूना कवी इशारा देतात. यामधून कवीची सामाजिक विषमते बद्दलची सखोल जाणीव व्यक्त होते. बापाच्या हत्येची माळ गुंफताना राजकीय व्यवस्थेचे नाव घेतात. दुःख दळता दळता आत्महत्या करणारे शेतकरी यावर नक्कीच मात करतील असा विश्वास व आशावाद ही प्रकट करतात.



Scanned with OKEN Scanner

शेतकरी आत्महत्या करतो इथेच ही शोकांतिका संपत नाही. त्याची बायका-मुले बेवारशी होतात. देशोधडीस लागून यातनाचक्रात सापडतात. बाप एंडरीलचा डबा पोटात रिचवून स्वतःस संपवतो. अशा या शेतकऱ्याचे दुःख शिवारभर पसरते. त्याच्या मुलासही यातून बाहेर निघाऱ्याचा मार्ग सापडत नाही. त्याच्या मानसिकतेवर परिणाम होतो तोही शेवटी मृत्यूस जवळ करतो. याचे वर्णन करताना लिहितात,

"अखा एनडरींचा डब्बा पिऊन
बाप या प्रश्नातून मुक्त झाला
मला तर एक ढकणही पुरेल"

अकरा वर्षाच्या मुलास त्याच्या बापाच्या आत्महत्या नंतर घरातील प्रतिकूल परिस्थिती विषयी विचारणा केल्यास वरील उद्गार काढतो. बापाच्या वाटेने जाण्याशिवाय पर्यायच राहत नाही. म्हणजे आत्महत्याचे सत्र थांबणार नाही याची विदारक जाणीव करून देतात, 'जागतिकीकरणाचा एंडरीलचा डब्बा कुणी धुतला तुझ्या निर्मळ गंगेत' असाही प्रश्न विचारतात.

केंद्र सरकारने उपाययोजना म्हणून शेतकऱ्यांसाठी मोठे पॅकेज जाहीर केले. पण त्याचे बारकाईने निरीक्षण केल्यास ऊस कोल्हयाने पळविल्यागत स्थिती दिसते. शेतकऱ्यांच्या पदरी फक्त वरचा पाचोळा शेतकरी आत्महत्येचे सत्र काही थांबत नाही. जागतिकीकरण, शेतकरी आत्महत्या याविषयी जे राज्यकर्ते बोलले त्याचा समाचार व धांडोळा घेताना कवी लिहितात,

"पंतप्रधान म्हणाले,
घेतलेल्या कर्जाचे आणि कुटुंबाचे
नियोजन करता येत नाही
म्हणून शेतकरी आत्महत्या करतात
त्यावर शेतकऱ्यांनी विचारलं
देशाचे नियोजन जमलं नाही
म्हणून किती पंतप्रधानांनी
आतापर्यंत आत्महत्या केल्या"

यावर कोणतेच उत्तर राज्यकर्ते, पंतप्रधानांकडे नाही. संपूर्ण भारतात शेतकरी आत्महत्या करत असताना दिली जाणारी प्रतिक्रिया, बोचरी खंत कवीस अस्वस्थ करते. कोणत्याही परिणामाची पर्वा न करता सरकारविरुद्ध बोलायचे धाडस, जाब विचारण्याचे काम केले. घेतलेले कर्ज बुडवण्यासाठी शेतकरी आत्महत्या करतात असा एक जाणीवपूर्वक गैरसमज प्रस्थापित व बुद्धिजीवी करतात. वास्तव मात्र विरुद्ध असते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जे कुत्सित नजरेने पाहतात. त्यांना कवी उत्तर देतात. जो शेतकऱ्यांच्या आत्महत्येविषयी समाजाची दिशाभूल करतात त्यातील सत्य



Scanned with OKEN Scanner

कवी सांगतात. कुणबी बापाच्या आत्महत्येबद्दल पंतप्रधान नकारात्मक दृष्टीने बोलतात तेंव्हा कवी शेतकऱ्यांचे अनुभव प्रकट करताना जे म्हणतात ते लक्षणीय स्वरूपाचे आहे. यामधून शोषणाविरुद्धची जाणीव प्रकट करतात. यासंदर्भात मारुती घुगे लिहितात, "बदलत्या ग्रामीण जीवनाचे महत्त्व, जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त होणारा शेतकरी, त्यामागची कारणमीमांसा, संशयितांच्या विरोधात राग, चीड, शिव्या, शाप तीव्रपणे भालेरावांची कविता अभिव्यक्त करते. हे मत वास्तव सूचित करते.

आत्महत्येचा पहाड पचवणं खूप जड असते. हे केवळ भूमिपुत्रालाच ठाऊक असते. खुद्द भूमिपुत्र कवी म्हणून, 'आत्महत्येचा इतिहास पंढरपूरच्या यात्रे इतकाच जुना आहे' असे म्हणतात. आजच्या व्यवस्थेने उपेक्षित मानल्या गेलेल्या शेतकऱ्याच्या शोषणाची गाथा मांडताना वरील ओळी येतात. हा प्रश्न अव्याहत सुरू आहे जी काल दृश्य स्वरूपात होती ती आज अदृश्य रुपात वावरत आहे. सांस्कृतिक संदर्भ देत काव्यात्म परिणाम साधला. शेतकऱ्याच्या दारूण इतिहासास अधोरेखित करतात.

'टाहो' संग्रहात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे जसे वर्णन येते तसे उपायही सुचवलेले दिसतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे भांडवल आपल्या स्वार्थासाठी करणारे राजकीय पुढारी, व्यापारी, शहरातील सुखवस्तू लोक अशा सर्वांना ते धारेवर धरतात. यांना बारीक चाळणीत चाळून त्यांच्यातील उरलासुरला कोंडा काढून टाकावा. बुजगावण्यास घावरणारे हे लोक नाहीत म्हणून गोफणगुंडा वापरावा लागेल. शेवटी भूमीपुत्रांना जगलेला, भोगलेला कुणबही उपायच उतारा ठरणार असल्याचे ते सांगतात. शोषकांचा बंदोबस्त करण्यासाठी गोफणगुंड्यापासून ते नांगराच्या फाळापर्यंत ची आयुधे ही खास मातीशी नाते सांगतात. आपण नरम पडलो की लोक हानतात व दुबळे पडलो खणतात. त्यामुळे परीनामाकडे दुर्लक्ष न करता, छळून मारणाऱ्यास वरील शिक्षा दिली तर टाहो कमी होईल ही आशा कवी व्यक्त करतात.

जगण्या मरण्याच्या खेळात मरण नेहमीच जिंकत आले. मरणातच गुंफलेला हा आयुष्याचा मरण सोहळा साजरा करतात. हा फार मोठा भोगवाटा आहे. त्याच्या कविता वाचकास घायाळ करतात. संवेदनशील मनाच्या ठिकऱ्या उडवतात. शेतकरी स्वतःस शेतीत गाढून घेतो व स्वतःच विरून जातो. इतर यंत्रणानं कोंभ फुटताना, मनास पाझर फुटताना दिसत नाही. शेतकऱ्यांच्या शेतात दुःखाच्या राशी व घरातल्या कणगीत दुःखाचे धान्य. यामध्ये शेतकरी मायबापांना किती वडावं, खपावं यांच्या दुःखास सीमाच नाही. एकूणच जागतिकीकरणाच्या, निसर्गनिर्मित संकटाच्या दुष्टचक्रात अडकून जीवन यात्रा संपवणाऱ्या बळीराजाचा आर्त 'टाहो' कवितेतून ऐकावयास मिळतो.



Scanned with OKEN Scanner

**निष्कर्ष :**

मराठी ग्रामीण कवितेच्या परंपरेचा वारसा जोमाने चालवणारे, मराठी काव्यप्रांत समृद्ध करणारे इंद्रजित भालेराव एक महत्त्वाचे कवी असून कुणब्याचे सर्व भावविश्व कवितेतून साकारले आहे. कबीरांनी जनसामान्यांच्या सुखदुःखाचे जसे शेले विणले तसे भालेरावांनी शेतीमातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांची वस्त्रे विणली आहे. यामध्ये 'टाहो' या काव्यासंग्रहतून येणारे शेतकरी जीवनाचे दाहक व वास्तवदर्शी चित्रण पाहावयास मिळते. शेतकऱ्यांच्या जीवनातील अपार कष्ट, त्यांचे अभावग्रस्त जगणे याचे चित्रण करताना अधिक तीक्ष्ण कविता बनते. टाहो मधून या परिस्थितीचा, शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचा प्रखर शब्दात निषेध करतात. शेतकऱ्यांना विपरीत परिस्थितीत लोटून त्यांना आत्महत्येच्या कठड्यावर आणणाऱ्या संबंधी उपरोधाची, तर्ककठोराची, विसंगती दर्शनाची भाषा टाहोत आहे. टाहो हा शेतकऱ्यांच्या आत्मकलेशचा आहे. शेतकऱ्यांच्या दैन्य, दुःख बाबतचा कळवळा टाहो तून प्रकटला आहे. शेतकरी जीवनाचे अनुभव सहअनुभव होत व्यक्त होतात. ज्यातून कणव, राग व करुणा प्रकट होते. त्याची कविता न्याहाळताना पोटास पीळ पडतो. कंठ दाटून येतो, डोळयात अश्रू गर्दी करतात. घरोघरचे कर्ते पुरुष हताश होऊन आपल्या हाताने आपले आयुष्य संपवत असताना सगळे रखरखीत होत जाते.

दुष्काळ, कर्जबाजारीपणा, आत्महत्या हे विषय नवीन राहिलेले नाहीत. संत तुकारामांचे अभंग, महात्मा फुले च्या शेतकऱ्यांचा आसूड मधून शेतकऱ्यांच्या दुःखास वाचा फोडली आहे. या दुःखास प्राचीन काळापासून अनेक वैरी होते व आहेत. ज्या बळीराजास वामनाने पाताळात गाडले. आजही असे वामन आहेतच. दुःखाचे ओझे खांद्यावर घेऊन शेतकरी पिढ्यानपिढ्या जगत आहे. त्याची वाटचाल सुरू आहे. स्वबळावर, हिमतीवर आतापर्यंत तो तगला. त्याचे दुःख काळाच्या ओघात अधिक तीव्र झाले. त्यामुळे शेतकरी झाडाच्या फांदीचा आधार घेताना, एंडरील चा डब्बा पिऊन शेतकरी बाप स्वतःस संपवताना तसेच त्याची मुलेही हाच पाढा गिरवताना दिसतात. कारण तशी परिस्थितीच सभोवती निर्माण झालेली दिसते. दारिद्र्य व कर्जबाजारीपणाने बेजार झालेला शेतकरी अखेरपर्यंत इमानाशी नाते ठेवतो. शेवटी असह्य झाल्यावर, सर्व मार्ग बंद झाल्यावर स्वतःस संपवतो. इथेच दुःख संपत नाही तर मागे सारे कुटुंब दुःखाच्या खाईत लोटतो जाते. उलट राजकीय पुढारी, शहरातील सुखवस्तू लोक शेतकऱ्याच्या आत्महत्येचा राजकीय भांडवल म्हणून स्वार्थी वापर करतात. एवढेच नव्हे तर या आत्महत्येची कारण मीमांसा चुकीच्या पद्धतीने करताना दिसतात. तेव्हा कवी योग्य अशी मीमांसाही करतात व उलट यांना जाब विचारतात.



Scanned with OKEN Scanner

शेतकऱ्यांच्या आत्महत्यानी आपला कृषी इतिहास रंगू लागला होता व शेतकऱ्याच्या बाबत भयावह परिस्थिती निर्माण झालेली दिसते. त्यात जागतिकीकरणाने अनेक प्रश्न निर्माण केले. शेतकऱ्याच्या आत्महत्येचा विक्रम झाला. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात हेच चित्र कमी अधिक प्रमाणात दिसते. खाऊजा तील फसव्या, खोट्या जगास सामोरे जा. त्या ओळखण्यात गाफील राहू नका. कारण असेच सुरू राहिले तर माणसाच्या सावल्याही गायब होतील. हे कवी सूचित करतात. जागतिकीकरणातील गंभीर परिणाम समजून घेत त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सुचवितात. जागतिकीकरणाचे गंभीर परिणाम त्यांची कविता नेमकेपणाने पकडते. अनुभवाचा दीर्घ पल्ला आणि तपशिलासह बरकाव्याना कवितेत टिपण्याची कवीची धडपड दिसून येते. टाहो या संग्रहात सात दीर्घ कवितांमध्ये ७८ कवितांचा समावेश असून शेती करणारा आपला बाप आत्महत्या करू लागल्याचे दुःख कवीला होणे स्वाभाविक आहे. त्याच्या अंतःकरणातील टाहो जसा त्यांना जाणवला तसाच तो संबंध सांस्कृतिक विश्वालाही जाणवावा या हेतूने कवी आपल्याशी संवाद साधतात. भूमीपित्यास आपला बाप मानून त्याच्या जीवन मृत्युशी संघर्षरत असलेल्या आयुष्याशी समरस होऊन भूमीपित्याचे तीव्र-कोमल दुःख अनुभूतीच्या कसातून मांडतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच बोचरेपण त्यांच्या मनात खोलवर मुरल्यामुळे उपायापेक्षा उपरोध आणि तिरस्काराच्या छताच अधिक प्रमाणात उगवल्या. भालेरावांच्या कवितेतून शेतकऱ्यांचे भावविश्व, त्यांच्या आशा-आकांक्षा, अनेकविध प्रश्न, ताणतणाव, वेदना व मूल्यभाव इत्यादीचा अविष्कार प्रकट केला. शेतकऱ्याचे जीवन हेच कवितेचे केंद्र असून त्यांच्या जीवनाशी एकरूप झाल्याचा प्रत्यय येतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा आजच्या ग्रामीण साहित्यिकांच्या आस्थेचा विषय प्रश्न राहिलेला आहे. 'कविता' या प्रकारातून उत्कटपणे आपल्या हवालदिल शेतकऱ्यांच्या कौटुंबिक, आर्थिक व विफल भयग्रस्त मानसिकतेचे चित्रण प्रत्ययकारीपणे होताना दिसते. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या शिवारात फिरताना कवी उद्विग्न होतो. प्रत्येक वळणावर नव्या रूपात येणाऱ्या शोषकांचा चेहरा दाखवतात. आजचे वामन वेगळे आहेत याची जाणीव करून देतात. नवे चेहरे घेऊन येणारे शोषक व त्याची नीती सांगतात. शेतकऱ्याच्या दुर्दैवाचे दशावतार त्यांनी जवळून अनुभवले. 'टाहो' संग्रह त्याची प्रचीती देतो. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचा हा आर्त टाहो काळीज हेलावणारा व गाढ गहन घोरणाऱ्यानाही जाग आणणारा आहे. बहुतांशी कविता आत्महत्येच्या सूत्राने बांधलेल्या आहेत. आरंभीच्या २८ कविता आत्महत्याचे नानाविध संदर्भ घेऊन येतात. भूत, भविष्य व वर्तमानातील अनेक संदर्भांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्याची कर्मकहाणी उलगडली. आत्महत्येस जबाबदार असणाऱ्याची



Scanned with OKEN Scanner

मानगुट पकडणारी व सवाल करणारी कविता आहे. शेतकऱ्यांच्या दुःखाचा एक अनाहत नाद ऐकू येतो. अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नबरोबर काही उपायही सुचविले. त्यात शोषकविरुद्ध राग व्यक्त होतो. शोषकाबद्दलचा रोषही व्यक्त करताना त्याबद्दलची चीडही व्यक्त करतात. शोषणाविरुद्ध नवी मांडणी करताना आशावादही प्रकट होतो. शेतकऱ्यांच्या मनातील हुंकार कवितेद्वारे प्रकट केले. जागतिकीकरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या एकूणच ग्रामजीवनाचे नेमके व भावव्याकूळ दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. जशी कुणब्याच्या पोरास लढायला शिकवणारी कविता तशी ती कुणब्याच्या आत्महत्येवर मूलगामी चिंतनही करते. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे चिंतन करणारा हा काव्यसंग्रह आहे. व्यवस्थेच्या चाकाखाली भरडल्या जाणाऱ्या कृषिवलांचा हा आर्त टाहो आहे. तो वाचून आपण अंतर्बाह्य हलतो, भयचकित होतो. त्यामुळे अस्सल ग्रामीण जीवन दर्शन, कष्टकरी, शेतकऱ्यांच्या व्यथा वेदणानं पुरेपूर सजग करण्याचे सामर्थ्य टाहो च्या आक्रंदणात आहे यात शंकाच नाही.

संदर्भ :


१. भालेराव इंद्रजित, 'टाहो', प्रतिभास प्रकाशन, परभणी, तिसरी आवृत्ती २००८.
२. भगवान काळे (संपादक), 'इंद्रजित भालेराव यांची कविता : आकलन, आस्वाद आणि आक्षेप', साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, ७ ऑगस्ट २०१३.
३. घुगे मारुती, 'इंद्रजित भालेराव यांची कविता', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००१.


***




Scanned with OKEN Scanner



Kisan Shikshan Prasarak Mandal, Udgir

# Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur Dist. Latur - 431515



(NAAC Accredited 'B' Grade)

One Day Seminar (Online) on


## २००० नंतरची कविता: स्वरूप आणि आकलन

# Certificate

This certificate is awarded to Shri./ Smt./ Dr. Dadarao Gundre of S.M.D. Mohekar College, Kalamb in recognition of Participation in One Day National Seminar on "२००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन" Organised by the Dept. of Marathi Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur Dist. Latur on 26th November 2021. (ISBN No. 978-81-953976-4-8). He/She has Published a Research Paper on इंद्रजित भालेरावांच्या 'टाहो' काव्यसंग्रहातील शेतकऱ्याचे आकलन

| | | | |
|---|---|---|---|
| **Dr. Maroti Kasab** | **Prof.Dr. Anil Mundhe** | **Dr. D. D. Choudhary** | **Dr. Vasant Biradar** |
| Editor | Co-Editor | Vice Principal | Principal |

Scanned with OKEN Scanner



# उजेडवाटा

दादाराव गुंडरे

Scanned with OKEN Scanner

ICE
24

**उजेडवाटा** (कविता संग्रह)

कवी : प्रा. डॉ. दादाराव गुंडरे

ISBN 978-93-91689-24-7

**अरुणा प्रकाशन**

१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

© सर्व हक्क लेखकाधीन

: प्रथम आवृत्ती :- विजयादशमी (दसरा) १५ ऑक्टोबर २०२१

: **मुद्रक :** आर्टी ऑफसेट, लातूर

: **अक्षर जुळवणी :** हिंदवी कॅम्प्युटर, लातूर

: **मुखपृष्ठ रेखाटन :-** सरदार जाधव, औरंगाबाद

: **मूल्य :** ८०.०० रुपये

*"**उजेडवाटा**" या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित कवीचे असून त्या संबंधी प्रकाशन, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नव्हे.

Scanned with OKEN Scanner

# महात्मा गांधी : एक बहुआयामी व्यक्तिमत्व

संपादक

प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने
प्रा. व्ही. एन. रामटेके
प्रा. डॉ. एस. एस. साळुंके

9 788194 736400

महाविद्यालय प्रकाशन क्र. ०५

ISBN NO.978-81-947364-0-0

DDC Number : 923.254

प्रकाशक: डॉ. जे. बी. अंजने
प्राचार्य, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

प्रकाशन स्थळ: ऐनपूर ता. रावेर, जि. जळगाव, [महाराष्ट्र] पिन. ४२५५०७

मुखपृष्ठ:डॉ. संदीप एस. साळुंके

अक्षरजुळणी व मुद्रण:प्रकाशन विभाग, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

वर्ष : नोव्हेंबर, २०२१

मूल्य: विनामूल्य

© प्राचार्य, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर
ईमेल: svpca123@yahoo.com, svpca.librarian@gmail.com
संकेतस्थळ: http://ainpurcollege.org/

- या ई-ग्रंथातप्रकाशित झालेल्या लेखातील मते हि ज्या त्या लेखकांची आहेत. त्यांच्याशी प्रकाशक, संपादक सहमत असतीलच असे नाही.
- या कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर, इलेक्ट्रोनिक अथवा यांत्रिकी साधनांनी- फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकांच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.


Scanned with OKEN Scanner

# महात्मा गांधी : एक बहुआयामी व्यक्तिमत्व

| .No . | Chapter Title | Author |
|---|---|---|
| 1 | गांधीजी समजून घेताना ! | प्रा. अक्षय रविंद्र महाजन |
| 2 | महात्मा गांधींचे राष्ट्रीय एकात्मता संदर्भातील विचार | डॉ.मिलिंदकुमार भिकाजी देवरे |
| 3 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार | प्रा.देविदास भटू भामरे |
| 4 | राष्ट्रपिता महात्मा गांधीजी : प्रभावशाली व्यक्तिमत्त्व व गतिमान नेतृत्व | डॉ. महेश दिलीप औटी |
| 5 | २० व्या शतकातील महान विभूती : राष्ट्रपिता महात्मा गांधी | डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी |
| 6 | गांधीजींची पत्रकारिता | प्रा. डॉ. जगदीश घन:शाम खरात |
| 7 | गांधीवाद | प्रा. डॉ. जगदीश घन:शाम खरात |
| 8 | महात्मा गांधीजींचे सामाजिक कार्य | डॉ. देवयानी चव्हाण |
| 9 | महात्मा गांधींच्या शैक्षणिक विचारांचे ऐतिहासिक अध्ययन | डॉ. विलास भा. फरकाडे |
| 10 | महात्मा गांधीजींचे तत्त्व व कार्यपद्धती- एक अभ्यास | प्रा.प्रदीप नामदेव तायडे., प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने |
| 11 | महात्मा गांधी : सत्य, अहिंसा, सत्याग्रह एवं गांधी विचारो की प्रासंगिकता | प्रा॰ डॉ॰ संजय वामनराव भोळे |
| 12 | राष्ट्रपिता महत्मा गाँधी के आर्थिक विचारों की वर्तमान युग में प्रासंगिकता | डॉ. नेहा कल्याणी |
| 13 | Social Work of Mahatma Gandhi | Dr.Priya Narendra Kurkure |
| 14 | Bapu Kuti (Sevagram Ashram) : Inspiration Place | Mahadev C. Chunche |
| 15 | Basic Education: The Gandhian Approach to Self Dependance and Self Awareness | Dr. B.J. Mundhe |
| 16 | Moral and Spiritual Education: The Gandhian View Points | Dr. B.J. Mundhe |
| 17 | FUNDAMENTAL CONCEPTS OF GANDHIJI AND ITS RELEVANCE IN CONTEMPORARY INDIAN SOCIETY | Prof Swati Sagar Kathaley |
| 18 | महात्मा गांधीजी का मिट्टी, पाणी का प्रयोग और इंडियन ओपिनियन मे पत्रकारिता यह एक मानासशास्त्रीय अध्ययन | प्रा व्ही.एन.रामटेके |
| 19 | गांधी दर्शन और आदर्श व्यक्तित्व | डॉ. जगदीश पी. तंकोदरा |

Scanned with OKEN Scanner

# Certificate of Publication




This is Certify

**Dr. Dipak Subhashrao Suryawanshi**

**Contributed a Chapter**

"२० व्या शतकातील महान विभूती : राष्ट्रपिता महात्मा गांधी "

**Chapter No. 05 , Pages From 24 to 32**

**ISBN Number**

9 788194 736400

**PUBLISHED BY**

Dr. J. B. Anjane,
Publication Division,
S. V. P. Arts & Science College,
Ainpur, Tal-Raver Dist- Jalgaon, MS,
(INDIA) 425507

Publication ID: MG-05

Date of Publication: Nov. 2021

**Published a chapter in Peer Review edited Book**

" महात्मा गांधी : एक बहुआयामी व्यक्तिमत्व "

**Editors, Dr. J. B. Anjane, Prof. V. N. Ramteke, Dr. S. S. Salunke**

| Dr. S. S. Salunke | Prof. V. N. Ramteke | Prin. Dr. J. B. An |
|---|---|---|
| Managing Editor | Guest Editor | Chief Editor |

The eBook is open Access, Freely available on http://ainpurcollege.org/PublicationDivision/Default.aspx

Scanned with OKEN Scanner

5

# २० व्या शतकातील महान विभूती : राष्ट्रपिता महात्मा गांधी

लेखक : - डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख नेते, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारक म्हणजे मोहनदास करमचंद गांधी होत, महात्मा गांधी याच नावाने ते ओळखले जातात. इ.स.१९२० नंतर भारतीय लढ्याचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले, अहिंसेच्या मार्गांनी स्वातंत्र्य मिळवून दिले आणि लालबहादूर शास्त्री यांच्या समवेत राहून संपूर्ण जगाला प्रेरित केले. देशातील नागरिक त्यांना प्रेमाने बापू म्हणत. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांना महात्मा ही उपाधी दिली, आझाद हिंद सेनेचे सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये त्यांना राष्ट्रपिता असे म्हटल्याचे सांगितले जाते तसेच त्यांना स्वतंत्र भारताचे राष्ट्रपिता. त्यांची आज १५१ वी जयंती जगभरात साजरी करण्यात आली.

## उद्दिष्टे :-

- भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील महात्मा गांधी यांचे सामाजिक राजकीय शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील योगदान समजून घेणे.
- आपल्या रचनात्मक आणि समाजपयोगी कार्यातून समाजाला केलेला उपदेश व भूमिका विचारात घेणे.
- महात्मा गांधी हे समाजसुधारक, शिक्षण तज्ञ, तत्वचिंतक, राजकीय विचारवंत आणि जागतिक अर्थ तज्ञ होते, ही बाब लक्षात घेणे.
- महात्मा गांधी यांनी सुरु केलेली मुलोद्योगी शिक्षणपद्धती,व्यावहारिक जीवनशिक्षण प्रौढशिक्षण, स्त्रीशिक्षण, विद्यापीठीय शिक्षण आणि स्वातंत्र्य लढयातील अनुबंध विचारात घेणे.
- स्वदेशीचा स्वीकार, सूतकताई,कौशल्य विकास आणि ईश्वरभक्तीचा मार्ग स्वीकारताना प्रपंचाला सांभाळूनच करावा, ही वृत्ती समजून घेणे.

## गृहितके:-

- महात्मा गांधीचे सत्याचे प्रयोग हे आत्मचरित्र लोकप्रिय झालेले आहे.
- दैनदिन कष्ट व संघर्षातून गोरोबा काका यांनी ईश्वर भक्तीचा संदेश दिला आहे.



Scanned with OKEN Scanner

- देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे विविधक्षेत्रातील कार्य व समाजसुधारक म्हणून केलेले काम वाखाणण्याजोगे आहे.
- भारतभूमीत जन्माला आलेले महात्मा गांधी यांचे देशाच्या जडणघडणीतील योगदान अद्वितीय आहे.

## संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यासपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्री म्हणून प्रकाशित ग्रंथाचा उपयोग करण्यात आला आहे.

## विषय प्रवेश –

### महात्मा गांधी यांचा जीवन परिचय:-

किरकोळ शरीर प्रकृती असताना फक्त अहिंसेच्या बळावर त्यांनी इंग्रज सरकारला आपल्या देशातून परतून लावले. शांतता व अहिंसेचे पुजारी, महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ मध्ये गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. आईचे नाव तर पुतळाबाई तर वडिलांचे नाव करमचंद उत्तमचंद गांधी तत्कालीन काठेवाड प्रांतामधील पोरबंदर येथे दिवाण म्हणून काम करीत असतं. पुतळाबाई या खूपच धार्मिक वृत्तीच्या होत्या, त्या सतत उपवास करीत असतं. महात्मा गांधी यांच्यावर आईकडून बालवयातच धार्मिक संस्कारांचा अहिंसा, शाकाहार, सहिष्णुता व प्राणिमात्रांवर दया असे अनेक संस्काराचे धडे गिरवण्यात आले.

### महात्मा गांधी यांचा विवाह व शिक्षण :–

स्वातंत्र्यपूर्व काळात असलेल्या बालविवाह प्रथेनुसार महात्मा गांधी यांचा विवाह इ.स.१८३३ मध्ये वयाच्या तेराव्या वर्षी कस्तूरबा यांच्याशी झाला होता. गांधीजी त्यांना प्रेमाने "बा' म्हणत. लग्नानंतर महात्मा गांधी यांच्या पत्नी प्रथेप्रमाणे बहुतांश काळ त्यांच्या वडिलांच्या घरीच राहिल्या. इ.स. १८८५ साली गांधीजी पंधरा वर्षाचे असतांना त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. त्याच वर्षी त्यांना एक अपत्य झाले होते परंतु ते जास्त काळ जगू शकले नाही. यानंतर महात्मा गांधी यांना चार मुले झाली, हरीलाल, मणिलाल, रामदास आणि देवदास



Scanned with OKEN Scanner

महात्मा गांधी यांचा शैक्षणिक प्रवास –

महात्मा गांधी यांची बालपणापासून डॉक्टर बनण्याची इच्छा होती, परंतु वडिलांची त्यांना सरकारी नोकरीत दाखल करण्याची इच्छा होती. इ.स. १९८८ मध्ये आपले शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते उच्च शिक्षणाकरीता इंग्लंडला गेले. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये जावून भारतीय कायदा आणि न्यायशास्त्राचा अभ्यास केला. तिथे मोठ्याप्रमाणात मासाहार मिळत असल्याने, त्यांना शाकाहारी पदार्थ मिळेपर्यंत उपाशी राहावं लागतं असे. आईला वचन दिल्याने मासाहार,मद्यपान करणे वर्ज्य केले. त्यामुळे त्यांनी शाकाहारी माणसे शोधून त्यांची एक संघटना स्थापन केली तसेच त्यातील काही लोक ही 'थीयोसोफिकल सोसायटी' चे सदस्य होते. गांधीजीनी त्याठिकाणी राहून तेथील चालीरीती शिकण्याचा प्रयत्न केला. वकिलीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर बॅरिस्टर बनून इ.स.१८९१ स्वदेशी आले आणि वकिली करू लागले, परंतु लाजाळू स्वभावामुळे ते कोर्टात फार बोलत नसत तसेच त्यांना न्यायाधीशासमोर एखादा मुद्दा मांडणे कठीण जात असे.

महात्मा गांधी यांचा दक्षिण आफ्रिकेतील प्रवास:-

इ.स.१८९३ वर्षी वयाच्या २४ व्या वर्षी महात्मा गांधी हे भारतीय व्यावसायिकांचे न्यायालयीन सल्लागार म्हणून दक्षिण आफ्रिकेला गेले होते. त्याठिकाणी त्यांनी आपल्या आयुष्याची २१ वर्षे घालविली. त्याठिकाणी गांधीनी आपले राजकीय दृष्टीकोन, नैतिक व राजकीय नेतृत्व कौशल्याचे सुक्ष्म अध्ययन केले. दक्षिण आफ्रिकेत उद्योग, व्यवसाय आणि इतर कामधंद्यासाठी स्थायिक असलेल्या भारतीयांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. दक्षिण आफ्रिकेत गांधीजींना गंभीरपणे वांशिक वर्ण भेदाचा सामना करावा लागला. अपमान जनक वागणूक त्यांनी अनुभवली. एक प्रसंग असा महात्मा गांधी रेल्वेचा प्रवासात असतांना त्यांच्याजवळ पहिल्या वर्गाचे तिकीट असतांना सुद्धा त्यांना 'पीटर मारित्झबर्ग' रेल्वे स्थानकावर एका रेल्वे अधिकाऱ्याने खाली उतरवून तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसण्यास सांगितले. गांधीजीनी त्यांना नकार देताच त्या अधिकाऱ्याने गांधीजींना गाडी बाहेर ढकलून दिले गांधीजी खाली पडले. त्या दिवशी त्यांनी संपूर्ण रात्र फलाटावर काढली होती. गांधी अहिंसावादी असल्याने अन्यायकारक व्यवस्था बदलणे हाच त्यांचा मुख्य उद्देश होता. दक्षिण आफ्रिकेत महात्मा गांधीना अनेक कठीण परिस्थिती संघर्ष करावा लागला. तेथील



Scanned with OKEN Scanner

समाजात असणाऱ्या समस्याचा देखील अनुभव आला. त्यांनी भारतीय नागरिकांना राजकीय व सामाजिक हक्कांसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली.

महात्मा गांधी यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील संघर्ष –

महात्मा गाधी हे 'गोपाळ कृष्ण गोखले" यांना आपले राजकीय गुरु मानत असतं. त्यांनी राष्ट्रवादी नेता ,संयोजक आणि संघटक म्हणून आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवली होती. त्यांच्या संयम, संतुलन आणि प्रचलित व्यवस्थेत राहून काम करणे आदी विचाराचा प्रभाव त्यांच्या मनावर पडला होता. गोपाळ कृष्ण गोखले त्यावेळेला "भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे" अध्यक्ष होते. ग्रामीण भागातील राजकीय, आर्थिक ,सामाजिक परिस्थिती आणि सामान्य लोकांचे दु:ख, दारिद्र्य पाहून प्रचंड दु:खी झाले. अहमदाबाद येथील साबरमती नदीकाठी असलेल्या आश्रमात महात्मा गांधी राहू लागले. त्यानंतर सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अहिंसावादी सत्याग्रह करण्याचा मार्ग अंगिकारला.

<u>**चपारण्य सत्याग्रह**</u> **–**बिहारच्या चंपारण्य येथील शेतकऱ्यांवर इंग्रज मळेदाराकडून नीळ पिकवण्याची सक्ती करत आणि त्यांना अत्यल्प दरात मोबदला देत असत. शेतकऱ्यांना खूप नुकसान सहन कराव लागत होत. इंग्रजांच्या या मक्तेदारीला आळा घालण्यासाठी इ.स.१९१७ मध्ये गांधीजीनी तेथील जनतेला एकत्रित केले,अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करून न्याय मिळवून दिला. हाच त्यांचा भारतातील अहिंसेचा पहिला प्रयोग तो यशस्वी ठरला.

<u>**खेडा सत्याग्रह**</u> –गुजरात मधील खेडा हे गाव अतिवृष्टीमुळे ओलादुष्काळ पडला होता. तेथील शेतकऱ्यांची आणि त्यांच्या पिकांची अवस्था खूपच वाईट असतानाही इंग्रज सरकार शेतकऱ्यांकडून सक्तीने शेतसारा वसूल करीत होते, ही परिस्थिती पाहून महात्मा गांधीनी तेथे आश्रम उभारला, लोकांना संघटीत करून आणि शेतकऱ्यांना गांधीजीनी शेतसारा न भरण्याचा आदेश दिला, तेव्हा इ.स.१९१८ मध्ये शेतकऱ्यांनी शेतसारा बंदीची चळवळ सुरु केली .गांधीजींच्या नेतृत्वाखाली सरदार पटेल यांनी शेतकऱ्यांच्या समस्येसंबंधी इंग्रज सरकारसोबत चर्चा केली. ब्रिटीश सरकारने त्यांची मागणी मान्य करून सर्व कैद्यांची सुटका केली



Scanned with OKEN Scanner

**अहमदाबाद :कामगार लढा** –इ.स.१९१४ मध्ये झालेल्या पहिल्या युद्धानंतर देशात खूप महागाई वाढली होती. अहमदाबाद येथील कामगारांनी वेतनवाढीसाठी गिरणी मालकांकडे विनंती केली. परंतु त्याची मागणी अमान्य करण्यात आली.यावर गांधीजीन स्वत: जावून संप पुकारला आणि कामगारांसोबत उपोषणाला बसले. अहिंसावादी आंदोलनापुढे गिरणी मालकांनी हार पत्करून त्यांना वेतनवाढ दिली.

**असहकार चळवळ -** गांधीजी हे अहिंसेचे पुजारी असल्याने इंग्रजांविरुद्ध लढा देताना असहकार, अहिंसा आणि सविनय कायदेभंग हे तीन शस्त्र वापरले. इ,स.१९१९ साली पंजाबमधील जालियनवाला बाग हत्या कांडामुळे देशातील लोकांच्या मनात इंग्रज सरकारविरुद्ध भडका उडाला. ठिकठिकाणी मोर्चे निघाले ते मोर्चे थांबविण्यासाठी इंग्रज सरकारला खूप दमछाक करावी लागली,याच घटनेप्रकरणी इंग्रज सरकारचा निषेध केला. असहकार चळवळ सुरु करण्यामागे महात्मा गांधी यांचा असा हेतू होता की, भारतातील ब्रिटीशांचे राज्य हे केवळ भारतातील लोकांच्या सहकार्यावर अबलंबून आहे.

**असहकार आंदोलना दरम्यान घडलेली चौराचोरी घटना** –इ.स.१९२२ साली गोरखपुर (उ.प्र.) जिल्ह्याच्या चौरीचौरा येथे एका शांततापूर्ण चाललेल्या मिरवणुकीवर पोलीसांनी गोळीबार केला. पोलिसांनी केलेल्या गोळीबारामुळे असहकार चळवळीत सहभागी नागरिक खूप चिडले, त्यांनी प्रत्युत्तर देताना तेथील पोलीस चौकी जाळून टाकली. यात एक पोलीस अधिकारी व २२ पोलीस ठार झाले. ही घटना त्यांना कळताच खूप वाईट वाटलं, ते एकदम अस्वस्थ झाले. त्यांना वाटले लोकांनी असे करायला नको होत. अहिंसेच्या मार्गाने चालतांना असे प्रसंग उद्भवतातच. गांधीना वाटू लागलं की, आपण असहकार आंदोलन सुरु करून लोकांना अहिंसेच्या मार्गावर चालायला लावलं परंतु, अहिंसेच्या मार्गावर चालणे इतक सोप नाही, तसे करणे सर्वांनाच शक्य होणार नाही, म्हणून महात्मा गांधी यांनी आपली असहकार चळवळ मागे घेतली. याच घटना प्रकरणी महात्मा गांधी यांना मार्च १९२२ मध्ये कैद करण्यात आलं. गांधीजींच्या "यंग इंडिया" नावाच्या साप्ताहिक पत्रिकेत त्यांनी तीन राष्ट्रद्रोही लेख लिहिली आहेत अशाप्रकारचा त्यांच्यावर आरोप लावण्यात आला. त्यामुळे त्यांना सहा महिने तुरुंगवास झाल्यानंतर त्यांची तब्येत खराब झाली, त्यामुळे त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली.



Scanned with OKEN Scanner

दांडी यात्रा –इंग्रज सरकारने मिठावर कर लावल्याने त्याचा बोजा गरीब जनतेवर पडत असे. समुद्रात मीठ तयार करण्याचा भारतीयांना पूर्ण अधिकार आहे,त्यावर सरकारला बंदी करण्याचा अधिकार नाही. यासाठी महात्मा गांधी यांनी १२ मार्च १९३० साली साबरमती आश्रमातून दांडी यात्रेला सुरूवात केली. यात ७८ स्त्री-पुरुष अनुयायांसोबतच अनेक लोकसहभागी झाले. महात्मा गांधी यांनी दांडी यात्रेला सुरुवात करण्यापूर्वी ब्रिटीश व्हाईसरॉयला माहिती देवून सरकारचा अन्यायकारक कायदा मोडून काढण्यासाठी काढलेली ही पदयात्रा होती. पदयात्रेने काहीच फरक पडणार नाही, असे सरकारला असे वाटत होते. ५ एप्रिल १९३० रोजी ३८८ कि.मी.चे अंतर पूर्ण करून त्यांची पदयात्रा दांडी येथे पोहचली. ६ एप्रिलच्या पहाटे महात्मा गांधी यांनी आपली नेहमीची प्रार्थना आटोपून घेतल्यानंतर ते समुद्र किनाऱ्याकडे चालत गेले, सकाळी ठीक ८:३० वाजता त्यांनी मिठाचा खडा उचलून सरकारने लावलेला मिठाचा कायदा मोडून काढला. या प्रकरणी त्यांना पकडून कैद करण्यात आले, त्यामुळे संपूर्ण देशात हिंसात्मक आंदोलनाला सुरूवात झाली. परदेशी कपड्यांची होळी, दारूच्या दुकानांसमोर निदर्शन करणे,जंगल सत्याग्रह अशाप्रकारचे आंदोलन देशभर करण्यात आले होते. महात्मा गांधी सोबतच हजारो भारतीय नागरिकांना इंग्रज सरकारने कैद केलं होत. अटक केल्याप्रकरणी देशातील चळवळीना आळा घालण्यासाठी इंग्रज सरकारने 'लॉर्ड एडवर्ड आयर्विन' यांच्या नेतृत्वाखाली महात्मा गांधी यांच्या सोबत करार करण्याचे ठरवले, त्यानुसार मार्च १९३१ सर्व भारतीय कैद्यांना मुक्त केले.

भारत छोडो चळवळ –दुसऱ्या महायुद्धाच्या कालावधीत इंग्रज सरकारने भारतीय प्रतिनिधीना न जुमानता अनेक नागरिकांना जबरदस्तीने युद्धात खेचले. इंग्रज सरकार युद्धात व्यस्त असल्याने महात्मा गांधी यांनी संधी समजून इ.स.१९४२ साली 'भारत छोडो' हे आंदोलन सुरु केलं. आंदोलनात सहभागी असणाऱ्या लाखो लोकांना इंग्रज सरकारने तुरुंगात टाकल तर हजारो आंदोलकांवर गोळीबार करण्यात आला. गांधी आणि त्यांच्या समर्थकांनी इंग्रजांना ठणकावून सांगितले की," जो पर्यंत स्वातंत्र्य मिळणार नाही, तो पर्यंत भारत देश महायुद्धात सहभागी होणार नाही. ही चळवळ कोणत्याही प्रकारे थांबणार नाही". तसेच महात्मा गांधीनी या चळवळी दरम्यान आपल्या भारतीय जनतेला "करा किंवा मारा" असा मूलमंत्र दिला. भारत छोडो'



Scanned with OKEN Scanner

चळवळीच्या माध्यमातून संपूर्ण भारताला संघटीत करण्याच महत्त्वपूर्ण काम केलं होत. आंदोलन देशभर पसरले असताना ९ मे १९४२ रोजी महात्मा गांधी आणि त्यांच्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या सदस्यांना मुंबईत अटक करण्यात आली. त्यावेळी महात्मा गांधी यांना दोन वर्ष पुण्यातील 'आगाखान पॅलेस' या ठिकाणी कैद ठेवण्यात आलं. दरम्यान २२ फेब्रुवारी १९४४ मध्ये महात्मा गांधीच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांच निधन झालं. महात्मा गांधीना पुण्यात कैदेत असतांना मलेरियाची लागण झाली, त्यांची तब्येत खूप खालावली,तरीही लवकर सुटका केली नाही. ६ मे १९४४ साली उपचारासाठी त्यांनी सुटका करण्यात आली. महात्मा गांधी यांनी सुरु केलेल्या 'या चळवळीचा वनवा देशभर पसरल्याने इंग्रजांनी सुद्धा महायुद्ध संपेपर्यंत भारत देशाची सत्ता भारतीयांच्या ताब्यात देण्याचे स्पष्ट संकेत दिले. त्याप्रमाणे साधनसुचित असणारे सत्य आणि बलशाली अंहिसा या मूल्यांचा महात्मा गांधीजीनी सातत्याने पुरस्कार केला, त्यातून विराट मानसिक क्रांती घडवून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

<u>महात्मा गांधी यांचे निधन</u> –३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधी दिल्ली येथील बिर्ला बागेत सहकाऱ्यांसोबत फिरत असतांना त्यांना 'नथुराम गोडसे' यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. महात्मा गांधी यांना गोळी लागताच ते जमिनीवर कोसळले. असे म्हटले जाते की, महात्मा गांधी यांनी मृत्युपूर्वी मुखातून 'हे राम' असे उद्गार काढले होते. इ.स.१९४९ साली महात्मा गांधी यांचा मारेकरी आणि त्याच्या साथीदारांना पकडण्यात आले व त्यांच्यावर खटला चालविण्यात आला, नथुराम गोडसे आणि त्यांच्या साथीदारांना फाशीची शिक्षा देण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी, अस्पृश्यता निवारण, जातीभेद, गरीब-श्रीमंतीची दरी कमी करण्यासाठी या महामानवाने खूप मोलाची कामगिरी केली. म्हणूनच आजही भारतीयांच्या मनात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रचंड आदराची भावना आहे. त्यांच्या एकूणच कामगिरीसाठी ते भारतातच नाही तर संपूर्ण जगात आदर्श व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. महात्मा गांधी याचा जन्मदिन आंतरराष्ट्रीय अहिंसादिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो.

Scanned with OKEN Scanner

महात्मा गांधीजीबद्दल सामान्य लोकांना माहिती नसलेल्या सात महत्वाच्या गोष्टी :-

जगभरातल्या तत्वज्ञानात त्यांचा गांधीवादही समाविष्ट झाला आहे. *महात्मा गांधी शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी गांधीजींचे नाव पाच वेळा नोबेल समिती समोर आले होते. मात्र त्यांना हा सर्वोच्च पुरस्कार मिळाला नाही. गांधीजींच्या मृत्यूनंतर त्यांना नोबेल पुरस्कार न मिळाल्याची खंत पुरस्कार समितीने व्यक्त केली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध गांधीजी आयुष्यभर लढले. ब्रिटिशांनी गांधीजींच्या मृत्यूनंतर २१ वर्षांनी त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट काढले. महात्मा गांधी यांची अंत्ययात्रा ही ८ किलोमीटर लांब होती. जवळजवळ १० दशलक्ष लोकं अंत्ययात्रेत सहभागी झाले होते *गांधीजींनी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक प्रसिद्ध व्यक्तींना पत्रे लिहीली आहेत. यात हिटलर, टॉल्सटॉय आणि आइन्स्टाइन यांचा समावेश आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर पहिल्या संविधान सभेत पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भाषणा दरम्यान गांधीजी उपस्थित नव्हते. महात्मा गांधी यांच्या मृत्यूवेळी परिधान केलेले कपडे आजही संग्रहालयात सुरक्षित ठेवण्यात आले. ॲपल कंपनीचे सर्वेसर्वा-संस्थापक स्टीव्ह जॉब यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा पगडा होता. गांधीजींच्या सन्मानार्थ ते गोल फ्रेमचा चश्मा वापरतात.

गांधींजीवर लिहिलेल्या गद्य काव्यात बाबा आमटेनी म्हटले की, "महात्मा गांधी सांगून गांधी सांगता येणार नाहीत, उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटण्यासाठी कदाचित कॉम्प्यूटर लागेल, पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त मुद्रा कोणत्याही इतिहासाला पुसून टाकता येणार नाही." सर्वश्रेष्ठ तत्वज्ञ ॲल्बर्ट आइन्स्टाइन यांनी गांधीजींच्या निधनाची वार्ता समजताच उद्‌गार काढले, की, "असा हाडामासाचा महान गांधीसारखा माणूस या भूतलावर वावरत होता, यावर कदाचित भावी पिढ्या विश्वास ठेवणार नाहीत ." अनेक तत्त्ववेत्त्यांनी म्हटले, "मानव जातीला पापातून मुक्त करणारा व शांततेचे मानवी विश्व भविष्यकाली निर्माण होईल, अशी आशा निर्माण करणारा हा माणूस होता." तसेच रस्किन जॉन यांचे 'अनटू धिस लॉस्ट' हे पुस्तक प्रवासात वाचत असताना त्यांनी लिहिले कि, रस्किनच्या पुस्तकाने मला जिंकले, त्यामुळे माझ्या जीवनात रचनात्मक परिवर्तन झाले."



Scanned with OKEN Scanner


निष्कर्ष :-

एकूणच २० व्या शतकातील महान विभूती राष्ट्रपिता महात्मा गांधी, त्यांच्या जीवनात अनेक संघर्षमय प्रसंग आले, जणू एकप्रकारे एकसंघ भारतात अखंड लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी ते सतत धडपडणारे व्यक्तिमत्व होते. तसेच टॉल्सटॉयसारख्या जगदवेत्त्यावर त्यांच्या शैलीचा चांगलाच प्रभाव होता, आजही न उकललेल कोड आहे. कदाचित न उलगडणारे ते विलक्षण गूढ आहे. जगातील अनेक वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांनी, जनमत घेणाऱ्या तज्ज्ञांनी महात्मा गांधी म्हणजे सर्व श्रेष्ठ व्यक्ती असल्याचा निर्वाळा दिला आहे. ही गोष्ट भारतीयांच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची आहे, अशा पूज्यनीय महान विभूतीस विनम्र अभिवादन !

संदर्भ :-


- *डॉ.गुंडरे दादाराव, मराठी कवितेतील महानायकांचे दर्शन, मैत्री प्रकाशन, लातूर*
- *पाटणे यशवंत , संस्कृती प्रकाशन ,पुणे*
- *www.google.com*


Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner


मूल्य : चार सौ पचीस रुपये मात्र
ISBN : 978-93-93403-08-7

| | | |
|---|---|---|
| पुस्तक | : | मराठी से हिन्दी में अनूदित दलित आत्मकथाएँ |
| लेखक | : | प्रोफेसर मुकुन्द गायकवाड |
| कापीराइट | : | प्रकाशक |
| प्रकाशक | : | समता प्रकाशन |
| | | बजरंगनगर, रूरा- कानपुर (देहात) 209303 |
| | | Mob. : 9450139012, 7007749872 |
| ई-मेल | : | samataprakashanrura@gmail.com |
| संस्करण | : | प्रथम 2022 ई. |
| मूल्य | : | 425.00 |
| शब्द-सज्जा | : | रुद्र ग्राफिक्स, हनुमन्त विहार, नौबस्ता, कानपुर-21 |
| मुद्रक | : | सार्थक प्रिंटर्स, कानपुर |


Marathi Se Hindi Mein Anoodit Dalit Aatmakathayen
By : Prof. Mukund Gayakwad
Price : Four Hundred Twenty Five Only

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रीय चर्चासत्र



## आ. य. पवार यांच्या



**संपादक**

[illegible]

**सहसंपादक**

प्रा. डॉ. [illegible]



Scanned with OKEN Scanner

# आ. य. पवार यांच्या निसर्ग व विज्ञानकविता

प्रकाशन : इन्व्हेंशन पब्लिकेशन,
INVENTION PUBLICTION
व्यवस्थापक - शरद जाधव
महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,
गांधी चौक, लातूर - ४१३ ५१२

संपादक : प्रा. डॉ. जयदेवी पवार

सहसंपादक : प्रा. डॉ. दुष्यंत कटारे

प्रथम आवृत्ती

ISBN : 978-81-931335-1-4

मुद्रक : इंडो एन्टरप्रायजेस प्रा.लि., लातूर
बी-४४, एम. आय. डी. सी., लातूर

अक्षर जुळणी : मनोज कुलकर्णी

मुद्रितशोधन : शरद खर्चे

मुखपृष्ठ : प्रशांत गोणे

किंमत : रु. ४२५/-



Scanned with OKEN Scanner

# (विभाग - अ) निसर्ग कविता


| अ.क्र | लेखक | लेखांचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. प्रमोद पडवळ | एकदिवसीय आभासी राष्ट्रीय चर्चासत्र | ११ |
| २. | प्रा. डॉ. अविनाश सांगोलेकर | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आ. य. पवार यांच्या निसर्गकविता : एक आकलन | १५ |
| ३. | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर अशोक तिखे | नव्वदोत्तरी कविता आणि आ. य. पवार यांच्या कवितेतील निसर्ग | २३ |
| ४. | प्रा. डॉ. अनंता सूर | आ. य. पवारांच्या कवितेतील निसर्गजाणिवा | २८ |
| ५. | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव | कुणब्यांच्या जीवनगाथेची निसर्गकविता | ३५ |
| ६. | प्रा. डॉ. सुवर्णा गुंड/चव्हाण | आ. य. पवार यांच्या ग्रामीण जीवननिष्ठेच्या निसर्गकविता | ४२ |
| ७. | प्रा. डॉ. शशिकांत पाटील | आदिनाथ पवार यांची निसर्गकविता : नैसर्गिक विश्वाची एकरूपता | ५५ |
| ८. | प्रा. डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे | आ. य. पवार यांची 'सीना' : आशयसमृध्द निसर्गकविता | ५९ |
| ९. | प्रा.डॉ.दादाराव गुंडरे | निसर्ग व मानव यांचा भावसंबंध साकारणारी आ.. य. पवार यांची कविता | ६५ |
| १०. | प्रा. डॉ. सुनील रामटेके | निसर्गचक्रात अडकलेल्या माणसाची कविता | ७५ |
| ११. | प्रा. डॉ. संजय सिंगनजुडे | निसर्गमूल्य जपणारी वास्तव कविता | ७९ |
| १२. | प्रा. सोनाली [illegible]-चव्हाण | आ. य. पवारांच्या [illegible] निसर्गकविता | [illegible] |
| १३. | प्रा. डॉ. लहु दिगंबर वाघमारे | [illegible] वर्तमान - [illegible] | [illegible] |
| १४. | प्रा.डॉ. संगीता मोरे | आ. य. पवारांच्या 'धूळपेर' काव्यसंग्रहातील निसर्गचित्रण | १०४ |
| १५. | प्रा. डॉ. पुनम येसंबरे | निसर्ग आणि बळीराजाच्या ऋणानुबंधाची धूळपेर | ११२ |
| १६. | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | ग्रामीण संस्कृतीची मूलतत्त्वे शोधणारी कविता - सीनाकाठच्या कविता | ११६ |
| १७. | प्रा. डॉ. अन्नपूर्णा चौधरी | कवि आ. य. पवार यांच्या 'धूळपेर' काव्यसंग्रहातील निसर्गकविता | १२० |
| १८. | प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार | आ. य. पवार यांच्या कवितेतील निसर्ग | १२६ |
| १९. | प्रा. डॉ. माधव जाधव | आ. य. पवारांची निसर्गकविता : एक आकलन | १३३ |
| २०. | प्रा.डॉ.रंजना मधुकर कदम | नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आ. य. पवारांच्या निसर्गकविता | १३५ |
| २१. | प्रा. डॉ. उज्ज्वला भोर | बदलत्या ऋतुचक्राचे रंग रेखाटणारी आ. य. पवारांची निसर्गकविता | १३९ |
| २२. | प्रा. डॉ. राखी जाधव | आ. य. पवारांच्या निसर्गकविता | १४४ |
| २३. | प्रा. डॉ. संभाजी जाधव | 'धूळपेर' कवितासंग्रहातील निसर्गकळा | १५० |




Scanned with OKEN Scanner

# निसर्ग व मानव यांचा भावसंबंध साकारणारी आ. य. पवार यांची कविता

**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे**

*सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,*
*शिक्षणमहर्षि ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,*
*कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद*
*पीन कोड ४१३ ५०७*

झाडे, वेली, पशु-पक्षी अर्थात संपूर्ण जीवसृष्टीच निसर्गाचे अपत्य आहे. सृष्टीच्या उत्पत्तीपासून मानवी जीवन आणि निसर्ग यांचे अतूट असे नाते आहे. मानवी जीवन हे निसर्गाचे एक अविभाज्य अंग आहे. निसर्गाशी आपल्या व्यक्तित्त्वाचे नाते शोधण्याचा प्रयत्न करणे हा 'स्वच्छंदतावादी' प्रवृत्तीचा महत्त्वाचा विशेष होता. केशवसुतांची बहुतांशी निसर्ग कविता या वृत्तीतून आविष्कृत झाली. निसर्ग व मानव यांच्यातील अतूट भावनिक संबंधाची जाणीव बहुतांश कवींना असल्याने आपल्या भावाभिव्यक्तीसाठी निसर्गाचा, निसर्गप्रतिमांचा आधार घेतला जातो. ''जेथे ओढे वनराजी । वृत्ती रमे तेथे माझी'' अशा शब्दात केशवसुतांनी निसर्ग प्रेम व्यक्त केले. निसर्गातून माणसाला जगण्यासाठी अन्नधान्य मिळते. तसे कवीला निसर्गातून काव्याचे पीक मिळते. असा विचार करून अनेकांनी मराठी कवितेत निसर्ग व माणूस यांचा संबंध जोडला आहे. निसर्ग हा माणसापेक्षा श्रेष्ठ आहे अशा भूमिका घेत कविता लेखन केले. निसर्ग हा अनेकांच्या निदीध्यासाचा विषय बनला. ज्यामध्ये केशवसुत संप्रदायातील बालकवी, रविकिरण मंडळातील कवी गिरीश, ग. ह. पाटील, नवकाव्य पूर्वकाळातील कवी अनिल, बा. भों. बोरकर, ना. घ. देशपांडे, वा. रा. कांत, इंदिरा संत, विंदा करंदीकर व मंगेश पाडगावकरांनी निसर्गनिष्ठा, निसर्ग प्रेरणा व निसर्ग अनुभूती कवितेतून व्यक्त केलेली दिसते.

१९६० नंतर कवितेत अनेक प्रवाह उदयास आले. त्यामध्ये ग्रामीण कविता हा एक महत्त्वपूर्ण प्रवाह होय. या कवितेत नवनवे उन्मेष दिसू लागले. निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी, ग. ल. ठोकळ यांच्यापासून ते ना. धों. महानोरांपर्यंत, विठ्ठल वाघ ते इंद्रजीत भालेरावांपर्यंत मराठी ग्रामीण कविता बहरली. पुढे ही कविता नव्या व वेगळ्या वाटा चोखाळती झाली. ग्रामजीवनातील निसर्ग सौंदर्याने नटलेली कविता आता ग्रामजीवनातील दैन्य, दुःख, कष्ट, कृषिनिष्ठा प्रभावीपणे चित्रित करू लागली. १९९० नंतर आलेल्या 'खाऊजाने' जीवनाच्या दिशाच बदलल्या. या बदलत्या दिशांचा, पर्यावरणाचा वेध घेणारी कवी आ. य. पवार यांची निसर्ग व माणूस यांचा



Scanned with OKEN Scanner

भावबंध साकारणारी कविता समजून घेणे अगत्याचे ठरते. आ. य. पवार हे नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातील एक चिंतनशील कवी आहेत. त्यांचे 'रानमाती', 'सीनाकाठच्या कविता', 'ऊनपाऊस', 'धूळपेर' हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी कथा, बालसाहित्य या प्रकारातही साहित्यनिर्मिती केली व स्वतःचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले. आ. य. पवार हे अहमदनगरच्या मातीतील एक महत्त्वाचे कवी. त्यांच्या कवितेत या परिसराचा रानगंध मिसळला आहे. नैसर्गिक पार्श्वभूमीवर जामखेडसारख्या दुष्काळी भागात कर्मभूमीशी इमान राखत साहित्य साधना करतात. आ. य. पवार यांची कविता विविध अंगानी नटलेली आहे. यात निसर्ग आहे. समाजजीवन, कृषिजीवन, आशावादी दृष्टिकोन, प्रीतीची भावना, दुष्काळ, भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार, गरिबी, नीतीमूल्यांचा र्‍हास, ऐतिहासिक, विज्ञानवादी, भाषाविषयक दृष्टिकोन, राजकीय, जीवनवादी आणि निसर्गपर कविता ही त्यांची विषयांची समृद्धी आहे. मनाने ग्रामीण मातीत रमणारे, ग्रामीण जीवनाच्या व्यथा-वेदना शब्दबद्ध करणारे आणि ग्रामीण जीवनाच्या परिवर्तनाची तीव्र इच्छा बाळगणारे कवी आहेत. ग्रामीण जीवन हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू असून आपसूकच त्यांच्या कवितेतून तेथील माती, माणसे, पाऊस, पिके, निसर्ग इत्यादीचा आशय व्यक्त होताना दिसतो. प्रस्तुत शोधनिबंधातून मानवी जीवन व निसर्ग यांचा अनुभव जो कवितेतून साकारला आहे; तो स्पष्ट करणे हा या शोधनिबंधाचा हेतू आहे.

ग्रामीण माणूस आणि लहरी निसर्ग यांच्यातील संघर्ष हाच ग्रामीण जीवनातील खरा संघर्ष असल्याची जाणीव पवारांच्या कवितेतून प्रकट होताना दिसते.

"रानावनाचा संसार  
मेघमालेवर खेळं  
तुळशीला टांगलेली  
तुटे कुण्बिकीची माळ"

असे वर्णन 'धूळपेर' कवितेत दृष्टीस पडते. रानावनाचा संसार, तुळस, माळ यासारख्या प्रतिमामधून ही कविता अर्थगर्भ बनत जाते, असे ज्येष्ठ समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले प्रस्तावनेत म्हणतात. (धूळपेर पृ. ६)

तरीही निसर्ग हीच कुणब्याची नियती बनते. निसर्गापुढे त्याचे काहीही चालत नाही. केवळ कष्ट करणे, सहन करणे, एवढेच त्यांच्या हाती असते. कधी पीक उत्तम येते, तर कधी गारपीट सारे रान उद्ध्वस्त करून जाते. कधी पाऊस येत नाही, अशी निसर्गाची विविध रूपे कवितेतून पाहावयास मिळतात. गारपिटीचं तांडव, खोती, गारपीट या कविता उद्ध्वस्त झालेल्या ग्रामीण परिसराचे दुःख मांडतात. तसेच पावसाचा रूसवा, वळीवानं दिला धोका या कविता पावसाने उदध्वस्त होणारे गाव साकारतात.



Scanned with OKEN Scanner

ग्रामीण जीवनाची विविध रूपे त्यांच्या कवितेतून प्रकट होतात. ग्रामीण म्हटले की त्यातील पीकपाणी, पाऊस, राबणारे खेडूत स्त्री-पुरूष तसेच सभोवती पसरलेला अफाट निसर्ग येणे अपरिहार्य असते. जो निसर्ग मोठा आवाहक व मोहक आहे. कोणत्याही संवेदनशील मनास भुरळ घालतो. संवेदनशील करण्याचे सामर्थ्य त्यांच्या निसर्गपर कवितेत आहे. यासंबंधी 'पिसारा' ही कविता नमुन्यादाखल पुढे ठेवता येईल.

"जलदात गोठला वारा
अवखळल्या साजणी धारा
लांडोर थिरकता देही
मोराचा झडे पिसारा"

इथे निसर्गाचे गूढ व तेवढेच उत्कट चित्र प्रत्ययास येते.

२०२० मध्ये नगर जिल्ह्यात भरपूर पर्जन्यवृष्टी झाली. जीवनदायिनी सीनानदी खळाळती झाली. तिच्या प्रवाहाचा थयथयाट नगरकरांना कितीतरी वर्षांनी पाहण्यास मिळाला. या सीनेच्या प्राचीन रूपावर आधारित त्यांनी 'सीनाकाठच्या कविता' या काव्यसंग्रहाची निर्मिती १९९० मध्ये केली. या संग्रहातील सीना या अकरा कडव्यांच्या आशयसंपन्न कवितेतून अहमदनगर, बीड, उस्मानाबाद, सोलापूर जिल्ह्यातील अतिप्राचीन काळापासून डौलाने वाहणार्‍याच नदीचे जातिवंतच रूपच उभे केले. या कवितेतील भौगोलिक, राजकीय व ऐतिहासिक संदर्भ पाहिले असता सीनानदीची उदात्तता सहजपणे लक्षात येते. तसेच कवीचे लेखनसामर्थ्यही लक्षात येते. अहमदनगर शहर परिसरात फारशी भव्य न वाटणारी सीनानदी शिराढोणच्या परिसरात मात्र विस्तृत रूप धारण करते. छोटे-मोठे प्रवाह येऊन तिला मिळतात. शेत-शिवाराची, प्राणी, पक्ष्यांची तहान ती भागवते. ती जलप्रवाहाने सामान्य असली तरी परिसरास चैतन्यमय करण्याचे कार्य वर्षानुवर्षे ती करत आलेली आहे, असे तिचे महत्त्व वर्णन करताना कवी लिहितात -

"शिवशिणाची सीना ही
पुढे रुपवती झाली
रानमाळची पाखरे
शिराढोणी पाणी प्याली"

अशी साधी पण लक्षवेधी शब्दकळा पाहिली असता सीनानदीचा प्रवाह व परिसराशी असलेली कवीची एकरूपता कळते.

सीनेचा खळाळता प्रवाह दक्षिणेत गेल्यानंतर एखाद्या सळसळणाऱ्याच नागिनीसारखाच भासतो. श्रावणातील मेघ गर्जनेने सीना बेभान होते, तेव्हा तिचे वर्णन

"वाजे श्रावणाचा घन
सीना येतसे भरात
करी तांडव तीरात
पूर मावेना उरात"

अशी तिची बेबंध अवस्था होते. पावसाळयात दुथडी भरून वाहणाऱ्या सीनानदीचा रूद्रावतार हा शिवाच्या क्रोधाप्रमाणे कवीस भासतो. अत्यंत सकस कल्पनांना साकारत सीनेची महती गायली आहे. प्राचीन काळापासूनचा सीनानदीचा आलेख मांडणारी सुंदर कविता आ. य. पवार यांनी लिहिली. तिची थोरवी अगाध आहे. कारण ती पुरातन काळापासून, जीवनदायिनी बनून राहिली आहे. हा भाव प्रकट करताना 'गाणी गाती शेततळे, नाही आटली घागर' अशा शब्दातून तिचे मोठेपण अधोरेखित करतात. तसेच ही नदी जरी पवित्र, जीवनदायिनी, तिचा महिमा अगाध असला तरी ती आज प्रदूषित झालेली दिसते. तिचे पावित्र्य राखण्याची तळमळ, व तिला प्रदूषण मुक्त करण्याचा भाव कवी व्यक्त करतात.

सीनानदी हे आपल्या काव्यनिर्मितीचे ऊर्जाकेंद्र असल्याचे कवी सांगतात. 'सीनाकाठच्या कविता' या संग्रहातील काही कवितेतून भरभरून लिहिलेले आहे. काव्यनिर्मिती प्रक्रिया सांगतांना 'शब्दांची नाती' ही कविता पुढे येते. सीनानदीतील झुळझळ वाहणारे पाणी पाहून मी शब्दांना वेचीत राहतो. सृष्टीतून जणू दिव्य कैफ झुलतो आणि शब्दभाव झंकारत राहतात. यालाच कुणी काव्यदेवी म्हणतात. निसर्गसृष्टी, सीनानदीची सर्व रूपे त्यांनी इथे व्यक्त केलेली आहेत. कारण त्यापासून त्यांना कवितेची प्रेरणा मिळते. कवींची ही प्रांजळ कबुली महत्त्वाची वाटते.

विश्वाच्या अतक्य व अथांग रूपामुळे माणूस आश्चर्यचकित होतो. हे वारंवार कवितेत येते. 'उधारी'सारख्या कवितेतून फिनिक्स पक्ष्याचे अथांगपण व अतक्यपण माणसांमध्येही मुरले की काय ही जाणीव व्यक्त होताना दिसते.

"गायी गाऱ्याह भिंगोऱ्या का खेळतात पोरी
वसुधेची गुणमात्रा रूजे की शरीरी" ?

हे अथांगपण, अतक्यता कवीस आवाहन करताना आढळते.

'ऊनपाऊस', या संग्रहातील सैवर, रान, गोष्टी, सुगरण, रंग, नक्षी, महानंदा, वन, वळीव, खेडूताचं गाणं, अनुराग, वीज, महाकाळ यासारख्या काही कविता निसर्ग चित्रण करताना दृष्टीस पडतात. ज्या कविता निसर्ग व मानव यांचा सहसंबंध साकारतात. 'ऊनपाऊस' हे शीर्षकच दुष्काळाबाबत पुष्कळ काही सांगून जाते. मुखपृष्ठ देखील आशयघन आहे. वाळलेले झाड दुष्काळाचा प्रत्यय देते. तर अर्धे हिरवे झाड कवीची आशावादी दृष्टी व्यक्त करते. ऊन सोसल्याशिवाय हिरवळ प्राप्त होत नाही. मानवी जीवनातील हे द्वंद्वच जणू कवी शीर्षकातून मांडतात.



Scanned with OKEN Scanner

"हिरीकाठची बाभळ । झुले हिरीमंधी फांदी
हिरव्या काटेरी टोकालां । सुगरण खोपा बांधी"

'सुगरण' या कवितेतील ओळी भावगर्भ आहेत. शेवटी जीवन म्हणजे सुखदुःखाची संमिश्रता आणि ऊनपाऊस असा खेळ निसर्ग खेळतो. तसे सुखदुःखाचे खेळ माणसाला खेळावेच लागतात. हा संसार, प्रपंच म्हणजे जणू ऊन-पावसाचा खेळ आहे. त्यामुळे जीवनाकडे आनंदी वृत्तीने पाहण्याचा सल्ला कवी देतात. 'रानमाती' काव्यसंग्रहातील 'अंगाई', 'चांदरात', 'मावळतीचा सूर्य', 'पालखी' या निसर्ग कवितांशी रसिक तादात्म्य पावतो.

उदध्वस्त होणारे खेडे व तेथील माणसांच्या वाट्यास येणारे दुःख या विपन्नावस्थेस समाज जीवनातील विविध घटकाबरोबर निसर्ग देखील कारणीभूत असल्याचे मूलभूत चिंतन कवी पवारांनी 'लोखंड्या' कवितेत केले आहे.

"रान निब्बारलं कसा यील वाफुन जोंधळा?
नशिबात कुणब्याच्या पाणकळ्यात उन्हाळा."

हे वास्तव मांडताना कवी आपल्या मनातील विचार सौंदर्य प्रकट करतो. निसर्गाचे नानाविध विभ्रम रेखाटताना कवीच्या प्रतिभेस बहर आलेला दिसतो.

"''चंदनी ऽ रानात ऽ चांदणं सांडलं
शरदात राजाचं ऽ सैवर मांडलं"

शरदाच्या सौंदर्याला शब्दबद्ध करताना मानवी भावभावनांचे आरोपन कवी करतो. यापुढे पवार यांच्या कवितेतील निसर्ग देहधारी बनतो.

"माझं पिसाऱ्यावचं बन
बोर वाकून बघते
आणि शेजीची जांभळ
अगी काळी निळी होते."

ही निसर्गातील 'महनंदा' अंगभूत सौंदर्याची साक्ष देते. आ. य. पवार यांची कविता निसर्गातील मोहक सौंदर्याप्रमाणे निसर्गाचे भीषण रूपही ट्पिते, हे विशेष होय.

"रान उजाड जाहलं नाही कुठं हिर्वा मळा
खेड्यापाड्याच्या नशिबी मुक्या सोसायेच्या कळा"

ही निसर्ग कविता कुणब्याचा भोगवटा व खेड्यातील शेतकऱ्याची अगतिकता अधोरेखित करते.



Scanned with OKEN Scanner

निसर्गचित्रण करताना कवीने ओल्या व कोरड्या दुष्काळाची कविता लिहिली. महाकाळसारख्या कवितेतून भीषण दुष्काळी छाया पसरल्याचे वर्णन येते. येथे भूमीने पेर गिळली आणि हिवाळाच आता उन्हाळा, बनला आहे. २०१२ च्या भीषण दुष्काळाने जणू काही ऋतु पालटल्याने -

"भुई उसवे उसवे ओल दडे खोल खोल
ऐकू येईना नदीला रानसोबत्यांचे बोल" (महाकाळ)

अशी निसर्गाची अवस्था होते. नदीला पाणी असल्यावर रानातील विविध पशु, पक्षी नदीवर येतात. जणू काही ते नदीचे मित्र. दुष्काळाने नदी नाले कोरडे असल्यास रानसोबती पशु, पक्षी नदीकडे फिरकत नाहीत. दुष्काळाचे यथार्थ वर्णन इथे पाहावयास मिळते. समीक्षक सदानंद सिनगारे ही कविता संपूर्ण दुष्काळ कवेत घेत असल्याचा अभिप्राय नोंदवतात. (दै. चंपावती पत्र दि.२९.१२.२०२० पृ. ६)

२०१२ साली राज्यात भयाण पडलेला दुष्काळ पाहून कवीमनाची झालेली अवस्था 'महाकाळ'मधून व्यक्त होते.

"हिवाळयातच उन्हाळा ओसाडले रानमाळ
उभ्या जन्मी ना पाहिला असा दोड महाकाळ
पेर भूमिनं गिळली झाडझाडुरी झडली
जगबुडीची आवई भुऱ्याड ढगानी फोडली."

दुष्काळात काळे मेघ दिसत नाहीत. भुरे-पांढरे ढगच भयानता वाढवितात.

डोंगराची रया झडून गेली. हिवाळ्यात उन्हाळा जाणवायला लागला. रानमाळ ओसाड पडले. पेरणी झाली पण बी उगवलेच नाही. झाडाची पानेही गळाली. नदी-नाले, धरणे आटून गेली. पाणी पाऊस नाही. पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती, यात शेतकरी कसा जगणार? असा प्रश्न ते करतात.

निसर्गाचा सुंदर आषाढ ते वसंत ऋतु काळ एका फटकाऱ्यात त्यांनी उभा केला आहे.

"आषाढाच्या कृष्णमेघा
किती रंग लगडले
श्रावणाच्या सरीतून
इंद्रधनू झाले ओले.'
शरदाच्या अंगणात



Scanned with OKEN Scanner

चंद्रबन ऽ झुले ऽ
फुलवेड्या वसंताने
कोकिळेला सूर दिले."

यातून त्यांची प्रतिमासृष्टी, सौंदर्यात्मक संकरण, अलंकारयुक्त भावनानिष्ठ समतानता, संवाद, लय, विशेषणांचा वापर, नाट्यात्मकता, वातावरण निर्मिती यासारख्या अनेक घटकांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य त्यांची कविता देते. मिर्चीला फुले व नंतर लालजर्द मिर्चीचा बहर आल्यावर धरतीला लाल रंग प्राप्त होतो. याचे वर्णन 'आगूट' कवितेत करताना

"ह्या ग आगिन फुलांची धरतीला शोभा किती
जणू पोपटाच्या चुची फांदीतून पुढं येती
जसा पडतो पाऊस मिर्गा आधी रोहिणीचा
तसा हालतो पाळणा भावा आधी बहिणीचा"

या कवितेतून निसर्ग व माणूस, समाज यांच्यातील नैसर्गिक एकात्मक संबंध व्यक्त होतो. या निसर्गाची सर्जनशीलता सांगताना 'सैवर' कवितेत म्हणतात,

"काळ्या कांबळीत कोणी मोगरा पेरीला ।
खुडू पाहता रानी फेर गंधाने धरीला "

सुंदर प्रतिकात्मक योजनेतून कवीची सर्जनशीलता अधिकच उठून दिसणारे असे मोगऱ्याचे रमणीय वर्णन येते. आषाढ लाजतो, श्रावण नाचतो, चंद्र गालात हसतो असा मानवी भावनांचा आरोप निसर्गावर होतो. शरदाच्या चांदण्यात कोण्या मोगरा राजाचं स्वयंवरच जणू मांडलं आहे, अशी रमणीय कल्पना कवी करतात. 'रान' या कवितेत हत्ती, मोगरा, कस्तुरी, हळदी झाड, मृग, हरीण हे निसर्गातील घटक येऊन मोगरा आणि कस्तुरीच्या गंधाची लोभस प्रतिमा मांडून जणू कविताच गंधीत झाली आहे असे वाटते. 'वीज' ही कविता मेघातील विजेचे विविध अंगी स्वरूप चित्रित करून विजेचा प्रभाव मानवी जीवनावर किती खोलवर पडलेला आहे, याचे सूचन ही कविता करते. 'वळीव' कविता चैत्राच्या महिन्यात वळवाचा पाऊस येतो व शेतकऱ्यांच्या घरादारात, रानात कसा थैमान घालतो याचे उदासी चित्रण करते. 'अनुराग' ही कविता बालकवींच्या निसर्ग कवितेच्या परंपरेत शोभून दिसेल अशी कविता आहे. खळखळाट करणाऱ्या सरीतेतील खडकांचे बेदूल ढळतात. मासोळी उसळी खात असलेल्या डोहात पाय सोडून अल्लड तरुणी जणू राधा बसली आहे आणि कृष्ण आकाशातील मेघाआडून तिला न्याहाळतो. कृष्णांच्या विरहाने गाय वनात हंबरते आहे. अशी सुंदर कल्पना येथे अवतरते. तसेच 'नक्षी' या कवितेतून निसर्गाचे लोभस दर्शन घडविले आहे.



Scanned with OKEN Scanner

आ. य. पवार यांच्या कवितेवर लेख लिहून अनेकांनी अभिप्राय नोंदविले आहेत. उपरोक्त शोधनिबंधाचा विचार करता 'ऊनपाऊस' संग्रहाविषयी समीक्षक सदानंद सिनगारे यांनी नोंदवलेले मत महत्त्वाचे वाटते. ते म्हणतात, "कवी आ. य. पवार यांची कविता प्रामुख्याने निसर्ग व शेतकरी जीवनाचे कविता असली तरी ती एकूण समाजजीवनाचा वेध घेताना दिसते. या कवितेत निसर्गाचे निरनिराळे चमत्कारिक विभ्रम आहेत. निसर्गाची विलोभनीय रूपे आणि बळीराजाचे त्याच्याशी जोडलेले अखंड नाते हा तर कवितेचा गाभा आहे. तसेच लेखक राजेंद्र भोसले यांनी पवारांच्या कवितेस 'रानफुलांनी सजलेला काव्यगुच्छ' म्हणून संबोधले आहे. (दै. तरूण भारत २७.०३.२०१९ पृ. ५)

**सारांश :**

निसर्ग हा काव्यप्रेरणेचे स्थान फार पूर्वीपासून बनून राहिला आहे. अनेकांनी सृष्टी व काव्य यांचा संबंध जोडला आहे. केशवसुत, बहिणाबाई चौधरी, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, ना. घ. देशपांडे, इंद्रजित भालेराव यांच्याप्रमाणे आ. य. पवार यांच्या कवितेतही निसर्गनिष्ठा, निसर्गजाणीव, निसर्गचित्रण पाहावयास मिळते. खरे तर आज पूर्वीचा आनंददायी निसर्ग राहिलेला नाही. वने तोडीने निसर्गात गारपीट, दुष्काळ एवढेच काय पण उष्णतेच्या लाटा उसळत आहेत. पूर्वीचे आभाळातले टिपूर चांदणे देखील आता विरळ होऊ लागले आहे. 'धूळपेर' मधील 'वनराई गान' या कवितेत गावाने जोपासलेली वनराई अविचाराने तोडल्याने हे निसर्गाचे शोकगीत रसिक मनाचा ठाव घेते व उदास भाव दर्शविणारे 'वनराई गान' हे शीर्षक योग्य वाटते.

शिवाराची वाढवी शोभा बाराभाईची वनराई
कोण लावुनी, राखील सांगा, ज्या ठायी तुटली राई
(धूळपेर, पृ. ७०)

कृषीसंस्कृतीच्या चित्रणाबरोबर ग्रामसंस्कृतीचे चित्रण जोडून कवितेत येताना दिसते. पवारांची कविता जीवनवादी असून निसर्गकविता अनेकांगी व अनेक पदरी आहे. ही कविता निसर्ग व मानव यांच्या संबंधावर प्रकाश टाकते, तसेच ती वाचकास अंतर्मुख करते. सांप्रतची बरीच कविता मुक्तछंदात निर्माण झालेली असून ती कविता गद्याकडे व दुर्बोधतेकडे झुकताना दिसते. अशा काळात कवी आ. य. पवार यांची कविता मात्र लयबद्ध, छंदोबद्ध व प्रतिमायुक्त आहे. म्हणून त्यांचे कवितेतील यश हे अभिनंदनीय आहे. सौंदर्यवादी प्रवाहाचा विचार करताना कालपरत्वे निसर्ग हा त्यांच्या चिंतनाचा मूलभूत विषय बनून राहिला आहे. निसर्गातील विविध बदल त्यांनी चितारले असून निसर्गाचे आखीव रेखीव चित्रण केले आहे. केवळ कल्पनेतच न रमता त्यांची कविता वास्तवाला भिडते. आ. य. पवार यांची कविता निसर्गातील सौंदर्य जसे रेखाटते तसे निसर्गाचे भीषण रूपही टिपते. दुपेडी निसर्गाचे वर्णन करते.



Scanned with OKEN Scanner

माणूस ज्या मातीत जन्मतो त्या मातीचा, परिसराचा अतूट असा ठसा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर उमटतो. याची प्रचिती त्यांच्या कवितेतून येते. जामखेड, कर्जत, करमाळा, पाथर्डी हा परिसर दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. तेथील जीवन चित्रित करण्याचा प्रयत्न कवीने यानिमित्ताने केला आहे. त्यांची कविता रानशिवाराचे एक समूर्त चित्र साकार करते. चंद्र चांदण्यापासून, सुगरण, कवठ, महानंदा, कोल्ह्याचे लग्न यासारख्या निसर्गातील साध्या व उपेक्षित विषयावर कविता आहेत. या सर्व सजीव सृष्टीचे कवीला अपार कौतुक आणि कुतुहल वाटते. हेच कौतुक या कवितेत शब्दरूप घेते. आ. य. पवार यांच्या कविता मिताक्षरी आहेत. लोभस चित्रे प्रकट करताना लय घेऊन स्फुरीत कविता अवतरली आहे. त्यामुळे चित्रदर्शी उपजत शैली हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. लोकगीताची लय घेऊन कविता अवतरल्या आहेत. पारंपरिक रूढी व समजुतीचा चपखल वापर करून कवितेने अस्सल ग्रामीण बोलीभाषेचा शब्दसाज परिधान केल्याने त्यांना रानाचा, रानमातीचा गंध लाभला आहे. त्यांच्या कवितेत विविधता आहे; तशी रचना शैलीतही विविधता आहे. त्यांची कविता संवादी व बोलकी असून वाचकाच्या हृदययाचा ठाव घेते. प्रतिमा, प्रतिके, अलंकार, विशेषणांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर, वाक्प्रचार व म्हणी, वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळा, एकूणच आशय व अभिव्यक्तीचा विचार केला तर अस्सल ग्रामीण कवी म्हणून त्यांची भाषाशैली वाचकास आकृती करून घेणारी आहे. कविता वाड्.मयीन गुणांनी अव्वल उतरली असून काव्यरचनेत त्यांनी प्रयोगशीलता जपली आहे.

त्यांची कविता अनुभवसमृद्ध आहे. मानव जीवन अनाकलनीय व गूढ वाटते. पशुपक्ष्यांचा मनमोकळा वावर दिसून येतो. सृष्टीतील प्राणीमात्रांचा, वनराईचा मानवी जीवनासाठी खूपच फायदा कवी सांगतो. आ. य. पवार कृषीनिष्ठ असल्यामुळे शेतीशी निगडित सर्व प्राणीमात्र त्यांच्या कवितेतून भेटीस येतात. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी या सर्वांची गरज असल्याची जाणीव कवी व्यक्त करतात. नगर जिल्ह्यातील जामखेडचा परिसर, तेथील समाजजीवन व निसर्ग डोळ्यासमोर तरळून जातो. निसर्गाकडे व एकूणच मानवी जीवनाकडे पाहण्याची कवीची आशावादी दृष्टी व्यक्त होते. मानवी जीवन व निसर्गातील होणारे बदल कवी अचूकपणे टिपतात. शिवार, वावर, रानमातीत रमणारे, तिच्याशी एकरूप होणारे कवीमन आशावादी आहे. रानाचा, शिवाराचा, तेथील झाडेवेलीचा, वनराईचा, लोकांचा, फळांचा, फुलांचा, पक्ष्यांचा, आमराईचा गंध घेऊन आलेली ही कविता आहे. कवीचे मन शिवाराशी, कृषी जीवनाशी पूर्णतः एकरूप झालेले आहे. ऊन, वारा, पाऊस, पिके, फळे, फुले यांचा रानगंध जपणारी ही कविता रानशिवाराची समग्र मनोगते व्यक्त करते. बालकवी, बहिणाबाई, चौधरी, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ यांच्या कवितांशी नाते सांगते. एकूणच नव्वदोत्तरी कवितेत कवी आ. य. पवार हे एक महत्त्वपूर्ण व प्रयोगशील कवी असून त्यांची निसर्गपर कविता निसर्ग व मानव यांचा भावबंध साकारणारी कविता म्हणून मराठी कवितेच्या प्रांतात वेगळेपण निर्माण करते.



Scanned with OKEN Scanner

## संदर्भ ग्रंथ :

१) प्रा. चंद्रकांत आदिनाथ पवार (संपा) 'सीनातीर' दिवाळी विशेषांक २०२०.

२) संपा. प्रा.डॉ. मधुकर क्षीरसागर, प्रा.डॉ. विजया राऊत, 'इंद्रधनू' रानजाई प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २७ फेब्रुवारी २०१८.

३) आ. य. पवार : 'धूळपेर', रानजाई प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १ एप्रिल २०१८.

४) डॉ. अक्षयकुमार काळ : 'अर्वाचीन मराठी काव्य-दर्शन', बनहट्टी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९९.

५) डॉ. भरत जाधव : 'तौलनिक साहित्याभ्यास', स्वच्छंद प्रकाशन, कोल्हापूर, २०२१.

६) डॉ. हेमंत खडके : अर्वाचीन कवीचा काव्यविचार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१२.

७) डॉ. वि. दा. वासमकर, 'मराठीतील कलावादी समीक्षा', अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर, २०१८.

८) आ. य. पवार : 'ऊनपाऊस', रानजाई प्रकाशन, पुणे, २०१३.

९) डॉ. जयदेवी पवार : आ. य. पवारांच्या काव्यातील ग्रामीण जाणिवा A(इंटरनॅशनल जर्नल - IDEAL - ISSN Sept.2021 page 97.100.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

आणि

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव, ता. जि. लातूर

मराठी विभागाच्या वतीने

## एक दिवसीय आभासी राष्ट्रीय चर्चासत्र

## प्रमाणपत्र

डॉ.दादाराव एकनाथ गुंडरे, एस.एम. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब जि. उस्मानाबाद यांना कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव, ता. जि. लातूर मराठी विभागाच्या वतीने बालकवि त्र्यंबक बापुजी ठोंबरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त ५ मे २०२२ रोजी नव्वदोत्तरी मराठी कवितेतील आय. य. पवार यांच्या निसर्ग व विज्ञान कविता या विषयावर एक दिवसीय आभासी राष्ट्रीय चर्चासत्र सहभाग घेतलाला / निबंध वाचन केले याबद्दल सन्मानपूर्वक हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

| संयोजक | सहसंयोजक | प्राचार्य |
| --- | --- | --- |
| प्रा. डॉ. जयदेवी पवार | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | डॉ. राम बाप |
| मो. ९४०३१००९८७ | मो. ८३०८३०५०५० | कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता.जि.लातूर |
| | | मो. ९४२२०७२०३५ |

Scanned with OKEN Scanner